PROPHETIC REVELATION

भविष्य-संदेशात्मक प्रकटीकरण

# लोगॉस: देवाच्या सृष्टीचे आदिकारण

*ज्याला कान आहेत तो ऐको!*

# PROPHETIC*REVELATION

GHIM MOH EST., P. O. Box 333
Republic of Singapore - 912742

MITA(P) 88/1/92 Issue 92 Fourth Quarter 1992

*गरुड आरोळी ठोकतो*

*The Eagle screams...*



*...the Dove leads.*

*कबूतर मार्गदर्शन करते*

'अंतिम काळाच्या संदेशात' असणाऱ्या या जगभरातील आणि विशेषकरून सिंगापुरातील विश्वासणाऱ्या बंधूच्या प्रीती व वर्गण्याद्वारा ही पुस्तिका उपलब्ध झाली आहे. हे मराठी भाषांतर (अब्बा - आग्रीपाडा बायबल बिलीव्हर्स असेम्ब्ली) द्वारा प्रसिद्ध करण्यांत येऊन वाटप केले जात आहे. ह्या पुस्तिकेतील शब्द-माध्यमाद्वारे आपणांस जीवंत प्रकटीकरण प्राप्त व्हावे आणि आपण **सांप्रतसत्यांत** स्थिरावलेले व मुळावलेले आणि मनुष्यांसमोर तुम्ही विश्वासात **प्रभू येशु ख्रिस्ताचे** नाम धारण करणारे व्हावे अशी आमची प्रार्थना आहे.

साठा असेपर्यन्त ह्या पुस्तिकेच्या जादा प्रति विनंतीवरून पुढील पत्यावर **ह्या घटकेचा संदेश** जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींना मिळतील.

**ब्र. रिचर्ड डिसोझा**
बी. आय. टी. ब्लॉक १२/६३,७८,
रेब्श स्ट्रीट, आग्रीपाडा,
मुंबई - ४०० ०११.
(दूरध्वनी : ३०१ ४९ ८६)

*... आपण प्रौढतेप्रत जाण्याचा नेटाने प्रयत्न करुं या. - इब्री ६:१,२;*

**This brochure cannot be sold or used in any way for the soliciting of funds.**

*संदेशवाहक : ब्र. रिचर्ड एल. एस. गॅन*
*अनुवादक : ब्र. पी. जी. भालेराव*

# प्रस्तावना

**आज्ञानांत** आनंद नसतो. ज्या बाबींवर आपला विश्वास आहे, त्या आपणा समजून उमजून घ्याव्यात, असे नव्या कराराचे लेखक आपणांस सतत कळकळीने सांगतात. *''तुम्हास ठाऊक नाही का ?''* अशाप्रकारचे प्रेषित पौलाचे सूचना व टोचणीवजा वाक्य त्याच्या पत्रात वारंवार आढळते.

येशू ख्रिस्ताच्या काळातील खोटे सिध्दांत शास्त्राबद्दलचे अज्ञान आणि रूढीपरंपरांचा परिणाम यातूनच उद्भवले होते. ***कारण ते मनुष्यांचे नियम व आज्ञा शास्त्र म्हणून शिकवले जात होते*** (मत्तय १५:९). तर मग आजच्या काळातील ख्रिस्ती लोकांचे अज्ञान त्याहीपेक्षा कितीतरी भयानक आहे! आपल्या प्रभु येशूच्या ह्या दटावणीचा जरा विचार करा : *''तुम्हाला माहीत नाही अशाची उपासना तुम्ही करता''* (योहान ४:२२).

मित्रा, तू कशाची उपासना करतो हे तुला माहीत आहे का ? की तू फक्त तुझ्या मंडळीतील रूढीपरंपरा व रीतीरिवाजांचे अनुकरण करत आहेस ? तुझा देव हा **आब्राहाम, इसाहाक व याकोब यांचा देव** आहे का ?

**सुभक्तिच्या गूजाचे प्रकटीकरण** (१ तिमथ्य ३:१६) किंवा पवित्र शास्त्रातील **देवत्व** ह्या विषयाची रूपरेषा थोडक्यांत पण शक्य तितक्या सुस्पष्ट रीतीने मांडणे हा या पुस्तकाचा हेतु आहे. सत्य तुम्हाला प्रकट होईपर्यंत तुम्ही बारकाईने शास्त्रशोध करावा अशी माझी आपणांस कळकळीची विनंती आहे.

येशू ख्रिस्ताच्या स्वर्गारोहणानंतर उण्यापुऱ्या ३०० वर्षांच्या कालावधीत ख्रिस्ती विश्वास हा संघटित धर्म बनला. आणि एका सत्य देवाचा प्रकाश ईश्वरविज्ञान पंडितांनी दडपून टाकला. याचे कारण त्यांनी देवाच्या वचनाऐवजी आपल्या संघटनांचे मतांगिकार व तत्वे आणि मनुष्यांच्या रूढीपरंपरा यांचा उदोउदो करून खोटे शिक्षण अमलांत आणले. त्याचाच परिणाम (दुष्परिणाम) म्हणून हल्ली देवत्वाच्या सिध्दांताचे भिन्न भिन्न असे अर्थ लावले जात आहेत. त्यातील बहुतेकजण असा विश्वास धरतात की देव हा ***''त्रिविध व्यक्ति''*** किंवा ***''त्र्यैक व्यक्ती''*** असा आहे. तर त्याचवेळी देव हा **दोन व्यक्ति** म्हणून अस्तित्वांत आहे असा कांहींजण विश्वास ठेवतात. आणि मग कांहींजण असे आहेत की ते देव **एक** आहे असा विश्वास धरतात परंतु येशू ख्रिस्ताचे देवत्व नाकारतात. पवित्र शास्त्रातील संतजनांनी अंदाज कधीच बांधला नाही किंवा तर्कही केला नाही. नंतरच्या काळातील विश्वासणारे देवाच्या वचनाकडे दुलर्क्ष करू लागले आणि पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनापासून ते जेव्हां व जसजसे दूर वाहवत गेले तसतसे ते पवित्र शास्त्राचा पायाच विसरू लागले आणि कालांतराने विसरूनच गेले. आणि मग मानवी विचारांची जशी काय सरशी झाली किंवा विजय झाला. त्यानंतर देवाबद्दलच्या अंदाजांची, तर्कांची आणि विचारतरंगांची एकप्रकारे रानटी घोडदौडच

सुरू झाली.

शुभवर्तमानाच्या पहिल्या शंभर वर्षांच्या कालादरम्यानचे व त्यानंतरचे बहुतेक यहुदी आपल्या एका देवावरच्या (एकेश्वरवादी) विश्वासाला घट्ट चिकटून राहिले. परंतु येशू ख्रिस्त हा त्यांचा मशिहा म्हणून देहात प्रकट झालेला देव आहे हे ओळखण्यांत ते अपेशी ठरले किंवा कमी पडले. संघटित ख्रिस्ती धर्माचीही गत कांही वेगळी नव्हतीं आब्राहामाच्या एकदेवत्वादी विश्वासाचा बदल त्यांनी बहुईश्वरवादात करून टाकला. त्यांच्या ईश्वरविज्ञान पंडितांनी आब्राहामाचा एक देव घेतला आणि त्याचे सपशेल तीन तुकडे (खांडोळी) करून टाकले. आणि मग आपल्या नंतरच्या वारसांचे ख्रिस्तीकरण करण्याच्या प्रयत्नात त्यांनी त्या तीन तुकड्यातील दुसरा तुकडा त्यांच्यापुढे (देव म्हणून) ठेवला. आजहि ते तेच करीत आहेत.


पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्या कांही ठराविक विश्वासणाऱ्यांनी सामान्यपणे **''देवाचे एकत्व''** ह्या सिध्दांतावर विश्वास ठेवला असला आणि सत्य म्हणून त्याचा स्वीकारहि केला असला तरी त्यांच्यापैकी पुष्कळांना वास्तविकरीत्या तो सिध्दांत पूर्णपणे समजलेला नाही.

तुम्ही ज्यावर विश्वास ठेवता तेवढ्यावरच समाधानी राहू नका; तर तुमचा विश्वास हा खरोखरच सत्य आहे ना, याची खात्री करून समाधान प्राप्त करा.

आपल्या आवडत्या उपदेशकांचे ऐकून घेतलेले व आम्ही 'पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणारे आहोत' असा दावा करणारे पुष्कळजण आहेत. त्यांच्याकडे बौध्दिक ज्ञानहि पुष्कळसे आहे. मग असे उपदेशक 'भले ते प्रेषित, संदेष्टे, सुवार्तिक, पाळक अथवा शिक्षक असोत, त्यांच्यापैकी फारच थोडे आत्म्याने भरलेले' आणि वचनाव्दारे समाधान पावलेले आहेत. एकादी बाब प्रभूच्या आत्म्याकडून खऱ्या अर्थाने जोपर्यंत प्रकट होऊन त्याबद्दल तुमची खात्री होत नाही तोपर्यंत 'मी विश्वास धरतो' असे म्हणू नका. *''दैहिक मनुष्य देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारीत नाही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात. कारण त्यांची पारख आत्म्याच्या य़ोगे होते''* (१करिथ २:१४). जोपर्यंत वरून देण्यात येत नाही, तोपर्यंत कुठलेच प्रकटीकरण सत्य प्रकटीकरण नाही. *''परंतु देवाने स्वतःच्या आत्म्याच्याव्दारे आपल्याला प्रकट केले, कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या रहस्यांचाहि शोधक आहे.''* (१ करिंथ २:१०) म्हणून *''.... देव खरा ठरो आणि प्रत्येक मनुष्य खोटा असा होवो.''*.(रोम:३:४)

**त्याच्या वचनाचा** अभ्यास करीत असतांना देव तुम्हाला आशीर्वाद देवो, हीच माझी प्रार्थना आहे.

**रिचर्ड एल्.एस्. गॅन**



**लेखक**

**''तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतील अशी वेळ येत आहे, किंबहुना आलीच आहे. कारण असे आपले उपासक असावे अशी पित्याची इच्छा आहे. देव आत्मा आहे; आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे.''**

— योहान ४:२३-२४

# लोगॉस:

# देवाच्या सृष्टीचे आदिकारण

## उत्त्पत्ति

*''**प्रारंभी** देवाने आकाश व पृथ्वीं ही उत्पन्न केली.''*

— उत्त्पत्ति १:१

आकाश व पृथ्वी ही सहा दिवसांत उत्पन्न केली गेली, ही सुप्रसिध्द व सर्वमान्य होण्याजोगी बाब आहे, परंतु हल्ली आपण ज्या पृथ्वीवर राहत आहोत ती अब्जावधि वर्षांनंतरच्या एका प्रदीर्घ अनिश्चित कालावधीत केलेली *पुनःनिर्मिती* होती. त्या पुनःनिर्मितीपूर्वीच्या कालादरम्यान पृथ्वी ही ओसाड, रिक्त आणि अंधकारमय अशा दुरवस्थेत होती.

ती तशी असण्याचे कारण काय बरे? त्यासाठी असे घडले तरी काय?

## इतिहासपूर्व काळ

देवाने उत्त्पन्न केलेल्या आकाश व पृथ्वी याविषयीच्या पवित्र शास्त्रांतील नोंदीनुसार असलेल्या घटनांचा क्रम आपण तपासून पाहू या. उत्त्पत्ति १:१ वरून आपला असा विश्वास आहे की देवाने आकाश व पृथ्वी ही *'प्रारंभ'* म्हटलेल्या कालावधीत उत्पन्न केली. तो कालावधी भूतकाळांत कोट्यावधि वर्षांचा होता. ***देवाने आकाश व पृथ्वी ही केली त्या काळाचा उत्त्पतिक्रम हा होय.*** यशया संदेष्टयाने म्हटले आहे की, *''देवाने तिची स्थापना केली, त्याने ती निर्जन राहावी म्हणून उत्पन्न केली नाही, तर तिजवर लोकवस्ती व्हावी म्हणून घडिली''.* (यशया ४५:१८) पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या शोधांनी हे सिध्द केले आहे की, असे एक युग किंवा कालावधि होता की ज्यावेळी त्या अतिप्रचंड-महाकाय-प्राणी (डायनासोअर) आणि दोन पायांवर उभे असणारे मनुष्यसदृश प्राणी ह्या पृथ्वीतलावर भटकत किंवा वावरत होते. *''पृथ्वी आकारविरहीत व शून्य होती, आणि जलनिधीच्या पृष्टभागावर अंधकार होता,''* (उत्त्पत्ति १:२अ) त्यापूर्वी कोट्यावधि वर्षांपूर्वीचे ते युग किंवा तो कालखंड होता. ह्यालाच साध्या भाषेत ***इतिहासपूर्वकाळ*** असे म्हणतात.

# दूतगण

पृथ्वी ही चांगल्या आणि आदर्श स्थितीत उत्पन्न केली गेली होती. इतिहासपूर्वकाळांत पृथ्वी हे सर्व प्राणीमात्रांचे गुण्यागोविंदाने एकत्र राहण्याचे वसतीस्थान असावे असा त्यामागचा हेतु होता.

आता ***आकाश व पृथ्वी यांचा जो प्रारंभ*** त्याच्या अगोदरची पायरी काय होती ते आपण पाहू या. अर्थात् ***दूतगणांचा प्रारंभ*** ही ती अवस्था किंवा पायरी होती.

इयोब ३८:४-७ मध्ये देवाने इयोबाचे अज्ञान उघड केले तेव्हांचे हे प्रश्न आहेत: *''मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हां तू कोठे होतास?:... त्यासमयी प्रभातनक्षत्रांनी मिळून गायन केले व सर्व देवकुमारानी जयजयकार केला.''* होय, देवाने पृथ्वीचा पाया घातला त्यावेळी त्याचे तारे (दूतगण, त्याचे दूत निरोपे) त्याच्याजवळ होते. देवाच्या अगाध, अनंत मनांत त्यावेळी त्याचा प्रत्येक बीज-शब्द-पुत्र (Seed-Word *son*) असून ते सर्वजण जयजयकार करीत होते.

देवाच्या प्रतिमेत व प्रतिरूपात उत्पन्न केलेल्या प्रत्येक निर्मितीला बरे व वाईट निवडण्याचे वरदान देवाने दिलेले आहे. संगणकातील यंत्रमानव (*robot*) अशी त्या दूतनिर्मितीची योजना केलेली नाही व नव्हती. दूतगण हे देवाच्या प्रतिमेत व प्रतिरूपात असल्याकारणाने त्यांच्या निवडीबाबत त्यांची कसोटी होण्याचे अगत्य होते. आणि त्यांच्या कसोटीसाठी पृथ्वी ह्या ग्रहाव्यतिरिक्त आणखी आदर्श असे ठिकाण इतर कोणते असू शकत होते? स्वर्ग हे देवाच्या निवासाचे स्थान असून इतर कुठल्याही हेतुसाठी ते नव्हते.

# पतित दूत

आदाम आणि हवेसाठी बनवलेल्या **एदेन बागेत** सैतानाने प्रवेश केला तेव्हा तो त्या अगोदरच **पतित** असा **दूत** होता. याचाच स्पष्ट अर्थ असा होतो की भूतकाळांतील युगांमध्ये एका विशिष्ट वेळी त्याची कसोटी घेण्यात आली होती. परंतु त्या कसोटीत अपात्र ठरल्यामुळे त्याला भूमीवर टाकून देण्यात आले होते. *(यशया १४:१२-१४ आणि यहेज्केळ २८:११-१७).*

योहान ८:४४ मध्ये, येशू (विश्वास न ठेवणाऱ्या यहुद्यांना) म्हणाला : *''तुम्ही आपला बाप सैतान यापासून झाला आहे, आणि आपल्या बापाच्या वासनाप्रमाणे करावयास पाहाता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक* (खुनेरी) *आहे आणि तो सत्यात टिकला नाही, कारण त्याजमध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तें स्वत: होऊनच बोलतो; कारण तो लबाड व लबाडाचा बाप आहे.''* हे म्हणत असतांना काईनाने हाबेलाचा वध केला त्या संदर्भात तो. (येशू) बोलत नव्हता. (काईन हा सर्पाचे बीज होता.) तसेच सर्पाने हव्वेला जे खोटे सांगितले त्याचाहि संदर्भ येशू देत नव्हता. तर सैतानाचा प्रारंभ व कसोटी ह्या घटनेकडे येशू निर्देश करीत होता. ह्याच पृथ्वीवर त्याकाळी (इतिहासपूर्व कालांत) सैतानाचा **एदेन बाग** होता आणि तेथेच त्याची कसोटी झाली.

यहेज्केल २८ मध्ये संदेष्टा भविष्यवाणी देत असतांना तो फक्त सोरेच्या

अधिपतीलाच (जो वैभवी व्यक्ति, ज्याने स्वतःच्या गौरवाची व स्वतःला उंच करण्याची आवड धरली होती) धमकावीत नव्हता तर सैतानालाहि धमकावीत होता. *''देवाचा बाग एदेन यात तू होतास''* (वचन १३) **परंतु एक गोष्ट बारकाईने लक्षात घ्या. पतन होण्यापूर्वी दूतांच्या अधिपतीसाठी असणारा हा एदेन बाग मोलवान पाषाणांचा होता, झाडेझुडपेयुक्त अशा हिरवळीचा नव्हता.** आदामाचा एदेन बाग हा फळाफुलांनी युक्त अशा वनस्पतींचा होता. *''एदेन''* याचा साधासोपा अर्थ *''अत्यानंद''*. किंवा *''नंदनवन''* असा आहे. मोलवान पाषाणांच्या त्या एदेन बागेतील सर्वकांही त्या अभिषिक्त करूब दूतासाठी केले होते. प्रत्येक मोलवान पाषाण हे त्याचे आवरण होते. म्हणजेच त्याचे वैभव होते. त्यासोबत त्याला एका विशिष्ट अधिकार पदावर उंच केले होते. *''... तू देवाच्या पवित्र पर्वतावर होतास.''* (वचन १४) त्याच्या ठायी अधर्म दिसून येईपर्यंत त्याची चालचलणूक यथायोग्य होती. (वचन १५). तो त्याच्या कसोटीत उणा भरला, अपात्र ठरला व त्याचे पतन झाले. लुसिफर—प्रभातपुत्र—याऐवजी तो आता सैतान म्हणजेच देवाचा विरोधक किंवा वैरी असा बनला.

सत्तर शिष्य आपल्या यशस्वी कामगिरीहून येशू ख्रिस्ताकडे परत आले तेव्हां ते हर्षातिशयाने भरून गेले होते. त्याचवेळी प्रभूने त्यांना इशारा दिला, *''मी सैतानाला आकाशातून विजेसारखे पडलेले पाहिले''* (लूक १०:१८). होय, सैतानाने स्वतःला उंच केले आणि त्यामुळे तो आपल्या मूळ स्थानापासून पतन झाला आणि *''राष्ट्रांना लोळविणाऱ्यास धुळीत टाकण्यात आले.''* (यशया १४:१२).

पृथ्वीची पुनःनिर्मिती केल्यानंतर लुसिफराऐवजी आता **मनुष्य** हा पृथ्वी या ग्रहाचा नवीन धनी नेमण्यात आला. ते धनीपण पुनः आपल्याकडे यावे यासाठी तो मानवाशी सतत लढत आलेला आहे, हे स्पष्ट दिसून येते. आपली ती महत्वाकांक्षा संपादन करण्यासाठी तो सर्व तऱ्हेचे प्रयत्न करीत आलेला आहे. त्याच्या लबाड्या आणि सर्व दुष्ट योजनांनी ही पृथ्वी हरतऱ्हेच्या हिंसाचाराने व पापाने भरली आहे. काय हा सैतानाचा खटाटोप! देवाने उत्पन्न केलेल्या सर्वांचा नाश करण्याचा त्याने चंग बांधलेला आहे! होय, तो या वाईट व दुष्ट युगाचा देव आहे!

होय, लुसिफराची निर्मिती करण्यात आली त्यावेळी तो परिपूर्ण असा होता. परंतु त्याच्याजवळ असलेल्या संपत्तीने व सत्तास्थानाने तो संतुष्ट नव्हता. असे दिसते की त्याला आपल्या स्थानाचा कंटाळा आला आणि आपण परात्परासमान व्हावे अशी सुप्त महत्वाकांक्षा त्याच्या हृदयात घर करू लागली. त्या गुप्तसुप्त महत्वाकांक्षेला तो आपल्या मनात थारा देऊ लागला (यशया १४:१४). देवाने हे ओळखले व त्याची दखल घेऊन त्याच्याविरूध्द कृति करायला सुरवात केली. त्याचवेळी लुसिफरामध्ये अधर्म आढळून आला आणि त्याने पृथ्वीवरील महाकाय प्राणीवर्गाला युध्दप्रवृत्त केलेः ***ठार मारा! खून करा! नाश करा!*** अशाप्रकारे लुसिफर खुनेरी व घातकी बनला होता!

हे सर्व पाहून देवाने त्याला याचा जाब विचारला, तेव्हांच त्याने (लुसिफराने) त्याची पहिली लबाडी केली. तो सत्यात टिकला नाही, हे निश्चित. *''तो प्रारंभापासून*

*मनुष्यघातक (खुनेरी) होता आणि सत्यात टिकला नाही, कारण त्याच्यामध्ये सत्य नाही.''*

परिणामी पृथ्वीची अवस्था उदास, भकास, उजाड व उध्वस्त अशी झाली. सर्व प्राणीमात्र आपापसात झगडून परस्परांना ठार मारीत होते. आणि त्यामुळे आजूबाजूच्या वातावरणात हाहाकार व कोलाहल माजला. सर्वत्र चालू असलेली प्रचंड प्रमाणावरील नासधूस आणि मृत प्राण्यांच्या सडलेल्या-कुजलेल्या शरिरांची दुर्गंधी ही पृथ्वीवरील हवामान-बदलाच्या स्थितीस कारणीभूत ठरली. जमीनीचे भूभाग ओसाड—वैराण पडले. अखेरीस देवाने ह्या सार्वत्रिक नाशाला पायबंध घालण्याचे ठरवले. त्यासाठी त्याने फक्त सर्व पृथ्वीवर बर्फाच्या जाड थराचे आवरण येऊ दिले व सर्वकांहीं क्षणार्धात गोठून गेले. त्यानंतर त्या पतित दूत-अधिपतीची सर्व सत्ता व अधिकार काढून घेण्यात आले.

सैतानाच्या ह्या वाईट नेतृत्वाच्या मागे गेलेल्या सर्व दूतांचेहि पतन झाले. स्वनिर्णयाने त्यांनी आपले स्वस्थान सोडले व गमावले. पण ज्या दूतगणांनी देवाशी असलेली आपली निष्ठा सिद्ध केली ते देवाच्या उजव्या बाजूला त्याच्या योजनेची कार्यवाही व अमलबजावणी करण्यासाठी राहिले.

देवाच्या वचनांत दडलेले खोल व गहन सत्य हे मोठमोठ्या ईश्वरविज्ञान-पंडितांना कधीच आकलन होऊ शकत नाही. तें सत्य देव फक्त बाळकांस व बाळकांसमान समजून घेण्याची नम्र वृत्ती असणाऱ्यांस प्रकट करील. होय, देवाचे वचन हे आम्हांस पुढीलप्रमाणे देण्यात आलेले आहे. *''नियमांवर नियम; नियमावर नियम; कानूवर कानू; कानूवर कानू; थोडे येथें, थोडे तेथें असे तो बोलत असतो.''* (यशया २८:१०) हेतु हा की आम्ही सत्य ग्रहण करावे.

डायनासोअर म्हटलेले महाकाय प्राणी हे आदामाच्या काळात अस्तित्वात होते आणि ते सर्व नोहाच्या जलप्रलयात नष्ट झाले, असे शिकवणारे लोक आजहि आहेत. हा धादांत मूर्खपणा होय! नोहाच्या काळात डायनासोअर अस्तित्वात होते असे मानले तर मग ते तारवांत का बरे नव्हते? देवाने नोहाला निश्चितपणे आज्ञापून सांगितले होते की *प्रत्येक जातीचे दोन दोन,* नरमादी तू आपल्याबरोबर तारवात घे. समजा ते तारवात आणले गेले असते तर मग आज ते आपल्याला पृथ्वीवर का दिसत नाहीत? मूळातच डायनासोअर ह्या महाकाय प्राण्यांची *प्रत्येक जोडी* व त्या काळातील राक्षसी पक्षी हे तारवात आणले जाऊ शकत होते का? ते त्या तारवात सामावू शकले असते का? क्षणभर विचार करा. हे महाकाय प्राणीमात्र व राक्षसी वर्णाचे पक्षी आदामाच्या ६००० वर्षांच्या काळापूर्वी कोट्यावधी वर्षे अगोदर अस्तित्वात होते, ही बाब पुराणवस्तुशास्त्राने सिद्ध केली आहे. याचाच अर्थ आदामाच्या काळात ते अस्तित्वात नव्हते.

उत्पत्ति १:१ मध्ये देवाने प्रारंभी आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली असे जे म्हटले आहे त्यात कुठलीच कालमर्यादा नोंदवण्यात आलेली नाहीं. घडलेल्या घटनांची नोंद त्या एकाच वचनांत नाही. (कारण उघडच आहे : ज्ञानी व विचारवंत यांच्यापासून सत्य लपवले जावे) ह्या सर्व प्रदीर्घ प्रक्रियेत अब्जावधि वर्षांचा अनिश्चित

स्वरूपाचा कालावधी समाविष्ट होऊ शकतो.

होय, लुसिफरासाठी त्याचा एदेन बाग होता. आदामाचाहि एदेन बाग होता. आणि आपला प्रभु येशू ख्रिस्त पुनरुत्पतीत (*Regeneration*) त्याच्या वधूसह राज्य करण्यासाठी आपल्या वैभवी राजसनावर बसेल तेव्हा त्याचाहि एदेन बाग असेल. (मत्तय १९:२८; यशया ६५:१८-२५).

# पुन:निर्मिती

सैतानाच्या पतनामुळे पृथ्वीची एकूण परिस्थिती भयाण (*dismal*) अशी झाली होती. याचे वर्णन उत्पत्ति १:२अ: मध्ये आढळते. त्यावेळी प्रकाश नव्हता. पृथ्वी ही रिक्त, ओसाड आणि उध्वस्त अशी झाली. *''आणि देवाचा आत्मा जलनिधीच्या पृष्ठभागावर तळपत होता.''* त्यानंतर देवाने (सहा दिवसांत) पृथ्वीची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली. म्हणजेच विस्कटीत झालेली घडी नीट करुन तिच्यावर पुन्हा एकदा वस्ती व्हावी अशी व्यवस्था देव करु लागला. ह्यावेळी प्राण्यांची निर्मिती पूर्वीपेक्षा आकाराने लहान अशी करण्यात आली.

*''मग देव बोलला, आपल्या प्रतिरुपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण करु...''* (उत्पत्ती १:२६). आणि पृथ्वीवर संचार करणाऱ्या प्रत्येक सजिवांवर मनुष्याला सत्ताधिकार देण्यात आला होता. हीच ***मनुष्याची सुरवात किंवा प्रारंभ*** होय. त्याला देवदूतांपेक्षा किंचित् कमी असे उत्पन्न करुन गौरव व थोरवी यांनी मुकुटमंडित केले व देवाने त्याला आपल्या हातच्या कृत्यावरचे प्रभुत्व दिले.

# देवत्व

उत्पत्ती १:२६ मध्ये देव इतर दोन देवांशी म्हणजेच पुत्राशी व पवित्र आत्म्याशी बोलत नव्हता. किंवा सल्लामसलत करीत नव्हता. पण त्रैक्यवादी ईश्वरपंडित मात्र तसा दावा करुन आपण त्यांच्यासारखा विश्वास धरावा अशी अपेक्षा करतात. याचे साधे कारण म्हणजे त्या वचनात आलेला ''आपण'' हा शब्द होय. उलटपक्षी त्याच वचनानंतरचे वचनात असे लिहिले आहे, *''देवाने आपल्या (त्याच्या) प्रतिरुपाचा मनुष्य निर्माण केला...''* ह्या विधानातील त्याच्या ह्या एकवचनी पुरुषवाचक शब्दाने ठामपणे हेच नमूद केले आहे की उत्पत्तीचे कार्य हे **एकाच दैवी कर्त्याचे** काम आहे. (योहान १:३,१०). ***असे आहे तर मग देव कोणाशी बोलत होता?*** अर्थात् परिक्षेत टिकलेल्या व त्याच्याशी एकनिष्ठ असणाऱ्या दिव्यदूतांशी तो बोलत होता. (यशया ६:१-८) सौजन्य म्हणून त्या थोर महान देवाने आपले मनोगत त्या दिव्यदूतांना प्रकट केले. देवदूत हे जरी निर्मिती करीत नसले आणि शुभवर्तमान गाजवीत नसले तरी देवाच्या सर्व कार्यात त्यांना रस आहे. ते देवाचे सेवक आहेत. कधी कधी त्यांना *''पुरुष''* असे संबोधण्यात आले आहे. (उत्पत्ती १८:२२, १९:१, प्रेषित १:१०) त्यांच्यापैकी कोणीच देवाला शिकवित नाही अगर सूचना करीत नाही. तरी देव आपल्या दूतांशी व मनुष्यांशी सल्लामसलत करीत असे (१ पेत्र १:१२;

प्रेषित. १०:१-८; उत्पत्ती १८:१७-३३; १९:१; स्तोत्र १०३:२०)

***देवाचे त्रैक्य*** अशी कुठलीच बाब नाही. तसेच ***एका देवात तीन व्यक्ति*** किंवा ***तीन व्यक्तिमत्वे*** असाही कांहीं प्रकार नाहीं. ***तीन देवांचे संयुक्त देवत्व किंवा ३ देवांचे देवत्व*** अशी शिकवण पवित्र शास्त्राने कधीच दिलेली नाहीं. त्रैंक्यवादी अशा तऱ्हेची शिकवण देतात व तिला ते एक *रहस्य* समजतात. आणि खरोखरच जोपर्यंत ते आपल्या बुद्धिमत्तेनुसार देवाची कल्पना करुन सिद्धांताची मांडणी करीत राहतील तोपर्यंत त्यांच्यासाठी हे एक नेहमीचेच रहस्य राहणार आहे. कीथ एल् ब्रुक्स् नावाच्या अशाच एका त्रैक्यवाद्याची ही सिद्धांत मांडणी पहा:

*''त्रैक्यवादाचा सिद्धांत जर मान्य केला नाही तर ख्रिस्त हा दैवी नाही आणि त्याचे उध्दारकार्याचे स्वरुप निष्फळ (कुचकामी) ठरते. जर त्रैक्य आहे आणि येशूची व पवित्र आत्म्याची भक्ति केली जात नाही, तर दोन तृतियांश देवत्वाला मानमहिम्यापासून वंचित ठेवले जाते.''* **'एका देवात तीन देव'** अशा तऱ्हेची देवत्वाची शिकवण ही यहुदी, मुसलमान व इतर पुष्कळशा सत्यशोधकांच्या दृष्टीने सर्वात मोठे अडखळण आहे.

अशा तऱ्हेची शिकवण कलस्सै १:१९ व २:९ ह्या वचनांशी प्रत्यक्षपणे विरोधीच आहे. त्या वचनात म्हटले आहे की ***ख्रिस्त येशूमध्ये देवपणाची (देवत्वाची) सर्व पूर्णता देहात वसते. देव म्हणून जे सर्व आहे तें तो आहे.*** तो केवळ एक तृतियांश देव आहे अशी पवित्र शास्त्राची शिकवण मुळीच नाही. काहींचा तर असा विश्वास आहे की, स्वर्गात तीन सिंहासने (राजासने) आहेत. त्या ठिकाणी देवाच्या उजव्या हाताला पुत्र बसेल (किंवा आता बसलेला आहे). देवाच्या आत्म्याला मनुष्यप्राण्याचे शरीर आहे असा ह्या लोकांचा विश्वास आहे.

प्रेषित योहानाने साक्ष दिली की, ''देवाला कोणी कधी पाहिले नाही, जो एकुलता एक पुत्र पित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रकट केले.'' (योहान १:१८) हे सत्य आहे. कोणाही मनुष्यमात्राने देवाला कधीच पाहिले नाही. आणि कोणीही मनुष्य त्याला पाहणार नाही. *''जो धन्य व एकच अधिपति, राजांचा राजा व प्रभूंचा प्रभु, ज्या एकालाच अमरत्व आहे, जो अगम्य प्रकाशात राहतो, ज्याला कोणा मनुष्याने पाहिले नाही, आणि कोणाच्याने पाहवत नाही.... त्याला सन्मान व युगानुयुगाचे सामर्थ्य असो. आमेन''* (१ तिमथ्य ६:१५-१६). **देव आत्मा आहे आणि तो अदृश्य आहे** (कलस्सै. १:१५).

यावर काहीजण असे म्हणतील की, स्तेफनाला दगडमार होत असतांना व तो मरत असतांना त्याने देवाला पाहिले कारण देवाच्या उजवीकडे येशू उभा आहे असे तो म्हणाला. (प्रेषित ७:५५-५६). *'देवाचा उजवा हात'* ही संज्ञा देवाचे वैभव आणि सामर्थ्य व्यक्त करते. तेणेकडून दया, कृपा आणि अधिकार ही सुद्धा दर्शवली जातात. तसेच *'त्याचा डावा हात'* म्हणजे देवाचा न्याय दर्शवतो. (निर्गम १५:६; मत्तय २५:३१-४६). बहु देवत्वावर विश्वास ठेवणारे जेव्हा म्हणतात की, स्तेफनाने देवाला पाहिले होते तेव्हा ज्या वचनावर आपला विश्वास असल्याचा ते दावा करतात त्याच वचनाशी ते विरोधी भूमिका घेतात — (योहान १:१८; १ तिमथ्य ६:१६;

कलस्सै १:१५; इ.)

पवित्र शास्त्रात जेथे जेथे येशू उभा असल्याचे चित्रित केले आहे त्या प्रत्येक ठिकाणी तो आपल्या मध्यस्थीच्या कार्यात प्रमुख याजकाच्या भूमिकेत किंवा अवस्थेत दिसतो. आपला मध्यस्थ किंवा प्रमुख याजक ही त्याची आता भूमिका आहे. तरीपण तो नेहमीच त्या प्रमुख याजकाच्या भूमिकेत राहणार नाही. लवकरच ह्या काळांत एके दिवशी तो जगाचा न्याय करण्यासाठी आपल्या वैभवी राजासनावर बसेल, तेव्हा तो न्यायाधीश व राजा ह्या भूमिकेत असणार आहे.

म्हणून स्तेफनाने त्याच्यां दृष्टांतात येशूला देवाचा प्रमुख याजक म्हणून पाहिले. त्याच्यामध्ये देवाचा पूर्ण अधिकार व सामर्थ्य होते. (प्रकटी १:१३; मत्तय २८:१८). तो देवाची दया व कृपा आहे.

*त्रैक्याची* कल्पना ही **बाबिलोनियन धर्ममत आहे.** इ.सन ३२५ साली रोमच्या मंडळीने ***'नायसियन धर्मपरिषद'*** *(Nicene Council)* बोलावली होती. तिच्यामध्ये हे धर्ममत पायाभूत सिद्धांत म्हणून मान्य करण्यात आले. रोमची ही मंडळी दुसरे तिसरे काही नसून *''मोठी बाबेल, कळवंतीणींची व पृथ्वीवरील अमंगळपणाची आई''* हे रहस्य आहे. त्या रोमच्या मंडळीने देवाचे तीन तुकडे केले. एवढेच नव्हे तर मूर्तिपूजक रोमी लोक जसे पूर्वजांचे मध्यस्थ वापरत तसेच संतांचे मध्यस्थ त्या मंडळीने बनविले. पतन झालेल्या ख्रिस्ती धर्माने फक्त काळोख्या सल्लामसलीतीची तरतूद केली. एक गोष्ट दुःखाने नमूद करावी लागते परंतु ते एक कटुसत्य आहेः बहुतांश मंडळ्यांतील सिद्धांत व शिकवण ही उपदेशकांच्या दैहिक विचारसरणीवर व बुद्धिमत्तेवर आधारलेली आहे. प्रेषित व संदेष्ट्यांच्या मूळ शब्दावर ती आधारलेली आहेत असे जे सामान्यपणे समजले (भासवले) जाते तशी ही बाब नाही.

ईश्वरीय पांडित्यांत व तत्वज्ञानांत प्रवीण असणाऱ्यांनी त्रैक्याची मांडणी किंवा जुळवणी केली तेव्हा शास्त्रवचनांकडे दुर्लक्ष केले गेले किंवा आपल्या पारंपारिक कल्पनाविलासाशी सुसंगतपणा दिसावा म्हणून शास्त्रवचनांना त्यांनी सोयीस्करपणे मुरड घातली. परिणामी, जे चूक तेच बरोबर म्हणून त्याचा स्वीकार केला गेला, आणि जे खरे व सत्य ज्ञान त्याच्याकडे चूक म्हणून तुच्छतेने पाहिले जाऊ लागले.

**आता ह्याचा विचार करा; *येशूचा पिता कोण होता?*** *''मरिया ही पवित्र आत्म्यापासून गरोदर झालेली अशी दिसण्यात आली,''* असे मत्तय १:१८ मध्ये नाही का म्हटले? (म्हणजेच पितृत्वाची कृति ही पवित्र आत्म्याकडून झाली, हो की नाही?) तरीपण *'देव माझा पिता आहे',* असा दावा येशू करीत असे. (योहान ८:५४). तर मग *''देव जो पिता''* आणि *''देव जो पवित्र आत्मा''* (ख्रिस्ती लोक बऱ्याच वेळा वापरतात त्या संज्ञा) हे दोघे म्हणजे ***एकच आत्मा आहे.*** नाहीतर मग येशूला दोन बाप होते असा अर्थ होईल. *(टीप : 'देव जो पवित्र आत्मा, व देव जो पुत्र अशी परिभाषा किंवा संज्ञा पवित्र शास्त्रात नाहीत. देवत्वामध्ये तीन वेगवेगळ्या व्यक्ति (?) आहेत असे दाखवण्यासाठी विश्वासभ्रष्ट ख्रिस्ती धर्मीय अशा संज्ञा वापरतात.*

इफिस ४:४ व योहान ४:२४ वरुन हे स्पष्ट होते की, **आत्मा एकच आहे.** येशूनेही म्हटले, *''मी व माझा पिता **एक** आहोत, दोन नव्हत.''* ह्यावरुन

काय दिसते? **देव एकच आहे!** *''एक देव सर्वांचा पिता, तो सर्वांवर असून सर्वव्यापी व सर्वांमध्यें आहे.''* (इफिस.४:६)

देवाने सर्व काही त्याच्या इच्छेस्तव उत्पन्न केले. (प्रकटी ४:११) तो सर्वज्ञ असल्याकारणाने त्याने स्वतःशीच संकल्प केला (इफिस १:९) *आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे तो अवघे चालवितो* (इफिस १:११), त्यांच्या *(त्रैक्याच्या)* मनाच्या संकल्पाप्रमाणे नव्हे. प्रकटी १:८ मध्ये म्हटले आहे, ***''जो आहे, होता व येणार (असा) सर्वसत्ताधारी प्रभु म्हणतो... मी आहे.'' ''आम्ही आहोत... होतो आणि येणार आहोत. (असे) सर्वसत्ताधारी...''*** अशी अनेकवचनी शब्दरचना इथे नाही. हेच ते एका देवाचे (तीन देवांचे नव्हे) प्रकटीकरण होय. एक देव त्याच्या मनाशी (त्यांच्या मनाशी नव्हे) संकल्प करतो. देव फक्त एकच आहे.

# अनंतकालिक आत्मा

सर्वसमर्थ आत्म्याशिवाय अनंतकालिक किंवा सनातन असे कांहीच नाही. तोच सर्वश्रेष्ठ (The Supreme One) असून सर्व भरपुरी तोच आहे. (The All-Sufficient One) *''जो उच्च, परमथोर आहे, जो अक्षय स्थितीत वास करतो, ज्याचे नाम पवित्र प्रभु आहे...''* (यशाया ५७:१५, इब्री, ९:१४). हा जो उच्च व परमथोर असा एकच तो **एलोहिम** आहे. परंतु हिब्रू भाषेत तो इतर अनेक नावांनी ओळखला जातो. **एलोहिम हा शब्द अनेकवचनी असला तरी त्याकडून अनेक व्यक्ति दर्शवल्या जात नाहीत. तर त्याची अत्युच्च थोरवी आणि महानता त्याकडून व्यक्त होते.** कारण खुद्द त्याच्या ठायी त्याचे अनेक किंवा विविध स्वभावगुण प्रकट होतात. उदा. उत्पन्नकर्ता, चालवणारा, तारणारा वगैरे. **एलोहिमचा** संबंध त्याच्या देवत्वाशी म्हणजेच दैवी थोरवीशी आहे. तसेच **एलोहिमच्या** संबंधात **याव्हे** *(YHWH)* हा शब्दही वापरला जातो. **याव्हेचा** अर्थ ***स्वयंपूर्ण असणारा*** किंवा ***स्वतःतील सनातन स्वयंभू अस्तित्वाचा असा एकच.*** पृथ्वीच्या मातीतून ज्या मनुष्याला त्याने घडिले, आणि आत्मिक शरीरात जो एलोहिमचे दृश्य रूप असा आहे, त्याच्याशी याव्हे स्वतःचा संबंध जोडतो. ***एलोहिमनेच स्वतःची ओळख याव्हे म्हणून पटविली.*** **याव्हे** हे जुन्या करारातील त्याचे कराराचे-नाव आहे. देवाने आब्राहामला दिलेल्या वचनानुसार इस्रायलच्या संतानाची सुटका करण्याचे वेळी हे दर्शविले (निर्गम ६-१३; उत्पत्ति १५:१३-१६) तसेच गणणा ६:२२-२७. नव्या करारामध्ये याव्हे (किंवा यहोवा) जेव्हा स्वतःचे प्रकटीकरण मानवी देहात करावयास आला तेव्हा त्याने **याशवा** (किंवा **यहोशवा**) हे नांव घेतले.

मला पुनः एकदा ही बाबा ठामपणे सांगू द्या : **गतकाळांतील अनंतकाळात अनंतकालिक पवित्र आत्मा—*एलोहिम*,** याच्या व्यतिरिक्त कांहीच अस्तित्वात नव्हते. तो यशयाशी बोलला, *''माझ्या पूर्वी कोणी देव नव्हता व माझ्यानंतरही कोणी होणे नाही...''* (यशसा ४३:१०) आणि *''आपण त्यांत जगतो, वागतो व आहो''*

## लोगॉस : देवाच्या सृष्टीचे आदिकारण

(प्रेषित १७:२८)

***''अनंतकाल'' म्हणजे वेळ आणि अवकाश*** (Time and Space) **यांची मर्यादा नसलेला काळ.** त्याला प्रारंभ व शेवट नाही. तो नेहमीच होता, आहे आणि असणार. म्हणून **येशूला देवाचा *अनंतकालिक* पुत्र म्हणणे हा विरोधाभास आहे.** कारण प्रत्येक 'पुत्राला' सुरुवात असते. *''अनंतकालिक पुत्र''* ही संज्ञा त्रैक्यवाद्यांचा अजब शोध आहे! **येशू हा देवाचा एकुलता एक पुत्र होता** (इब्री. १:६) स्तोत्र २:७ मधील ह्या भविष्यसूचक शब्दांकडे लक्ष द्या. *''मी निर्णय कळवितो : **यहोवा** मला म्हणाला, तू माझा पुत्र आहेस, आज मी तुला जन्म दिला आहे.''* याठिकाणचा *''आज''* ह्या शब्दाचा *अनंतकाळाशी* काहीच संबंध नाही. तो शब्द काळ किंवा वेळेच्या संदर्भात आहे. परंतु **सर्वसमर्थ आत्मा** हा *'अक्षय स्थितीत वास करतो'*. मर्यादा घालील असा **त्याला** आकार किंवा शरीर नाही. तो सर्वसमर्थ आणि सर्वज्ञ असल्याकारणाने सर्वव्यापी आहे. तो **अदृश्य** आहे (कलस्सै. १:१५; १ तिमथ्य १:१७; ६:१६), तसेच कोणीही मनुष्य **त्याला** पाहून जिवंत राहू शकणार नाही. (योहान १:१८; निर्गम ३३:२०) तर मग आपण देव जो पिता याला स्वर्गातील राजसनावर बसलेले पाहू शकू असें त्रैक्यमतवादी कसा काय विश्वास धरतात? मॉर्मन पंथाच्या जोसेफ स्मिथने **देवाला** आणि **येशू ख्रिस्ताला** पाहिल्याचा दावा कसा काय केला?

तुमच्यापैकी काहीजण असे विचारतील : *तर मग मोशे, यहोशवा, आब्राहाम आणि जुन्या कराराच्या काळातील इतर संतजनांनी कोणाला पाहिले व ते समोरासमोर कोणाशी बोलले?* (उदा. निर्गम ३३:११; २४:९-११; यहोशवा ५:१३-१५; उत्पत्ती १७:१; इत्यादी).

ह्या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपल्याला अनेक शास्त्रवचनांचा आधार घ्यावा लागतो आणि वेगवेगळया दृष्टिकोनातून हे पहावे लागते. आपल्याला माहीत आहे की शास्त्रवचनांचा संयुक्त अर्थ असतो आणि सत्य लपविण्याचा व त्याचवेळी ते प्रकट करण्याचा देवाचा खास दैवी हेतु असतो. संदेष्टे व प्रेषित ह्यांनी काही *विशिष्ट वाक्प्रचार* किंवा *शब्दप्रयोग* अशा खुबीने वापरले आहेत की त्यातील वर वर दिसणाऱ्या *शब्दाच्या* मागे ***गूढ व गहन*** अर्थ दडलेला असतो. आणि दैहिक मनोवृत्तीच्या व्यक्तीला हे शोधूनही सापडणार नाही! ख्रिस्त येशूने सुद्धा शास्त्रवचनांची पूर्ति व्हावी यासाठी अशा अर्थाचे उद्‌गार काढले (उदा. योहान २:१९; ६:५३-५८; १३:१८).

निर्गम ३३:१४ ह्या वचनाकडे दृष्टीक्षेप टाकून पाहू याः *''**यहोवा** म्हणाला, मी प्रत्यक्ष येईन...''* (माझी समक्षता तुझ्या संगती जाईल....'' रमाबाईचे भाषांतर)

हिब्रूमध्ये माझे मुख (*My face*) असे म्हटले आहे. आता ***माझी समक्षता*** किंवा ***माझे मुख*** याचा अर्थ काय? यशया ६३:९ मध्ये म्हटले आहे. *''त्यांच्या सर्व दुःखाने तो दुःखी झाला त्याची प्रत्यक्षता (किंवा मुख) दर्शविणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले.''*

*'त्याची समक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने'* त्यांचे (इस्राएलाचे) 'तारण केले.'

तो त्यांचा तारणारा होता. आणि त्यांचा **तारणारा** केवळ **एकच** होता हे आपल्याला माहित आहे. तर मग त्या पवित्र पुरुषांनी मशीहाला पाहिले असणार व त्याच्याशी ते बोलले असले पाहिजेत. तो (मशिहा) त्या सर्वसमर्थ देवाचे **मुख** किंवा **समक्षता** होता. **जो** *''त्यांच्यापुढे जाणार होता,'' ''जो त्यांना घेऊन गेला, त्यांना चालविले आणि ज्याने त्यांचा उद्धार केला.''*

निर्गम २३:२०-२३ मध्ये आपण वाचतो, *''पाहा, मी एक दूत (हिब्रूमध्ये निरोप्या) तुझ्यापुढे पाठवीत आहे, तो वाटेने तुझे संरक्षण करील आणि जे स्थान मी तयार केले आहे, तेथे तुला पोंचवील. त्याच्यासमोर तुम्ही सावधगिरीने राहून त्याचे सांगणे माना; त्याची अवज्ञा करु नका; कारण तो तुमचा अपराध माफ करणार नाही; त्याच्या ठायी माझे नाम आहे. तथापि तू खरोखर त्याचे म्हणणे ऐकशील व मी सांगतो ते सगळे करशील तर मी तुझ्या शत्रूंचा शत्रू, तुझ्या विरोध्यांचा विरोधी होईन. माझा दूत तुझ्यापुढे चालून... तुला तेथे नेईल.''*

ह्या शास्त्रवचनांवरुन स्पष्टपणे दिसते की सर्वसमर्थ देवाचा दिव्यदूत किंवा *निरोप्या* होता. त्याने *देवाच्या इच्छेची* परिपूर्ती केली. तो शब्दशः *देवाच्या* जागी उभा राहिला आणि *देव* होता. इस्राएल लोकांनी त्याची आज्ञा मानावी असा त्यांना खास आदेश होता. तसेच त्यांनी त्याला क्रोधास पेटवू नये असा त्यांना इशारा देण्यात आला होता. त्याची वाणी ऐकून आज्ञा पाळणे याचा अर्थ देव त्याच्याद्वारे जे *बोलला* त्याबरहुकूम सर्व कांही करणे, कारण *त्याच्यामध्ये देवाचे नांव होते.* आणि *ज्याच्यामध्ये देवाचे नाव आहे* अशी एकच व्यक्ति स्वर्गात व पृथ्वीवर आहे. ती व्यक्ति दुसरी तिसरी कोणी नसून जिवंत देवाचा पुत्र, ख्रिस्त येशू हा होय! *''मी माझ्या पित्याच्या नावाने आलो आहे.''* (योहान ५:४३) *पिता कोणाचाही न्याय करीत नाही, तर सर्व न्याय करण्याचे काम त्याने पुत्राकडे सोपून दिले आहे; यासाठी की, जसा पित्याचा सन्मान करतात तसा पुत्राचाही सन्मान सर्वांनी करावा. जो पुत्राचा सन्मान करीत नाही तो ज्याने मला पाठवले त्या पित्याचा सन्मान करीत नाही.* (योहान ५:२२-२३)

जो देवाची दृश्य समक्षता होता, ज्याच्याठायी देवाचे नाव होते, आणि जो इस्राएलाचा उद्धारकर्ता होता, तो येशू पृथ्वीवरील त्याच्या वास्तव्यापूर्वी अस्तित्वांत होता, असा याचा अर्थ होतो का?

## अदृश्य आत्मा, दृश्य शब्द

**येशू हा देवापेक्षा निराळी व्यक्ति म्हणून पूर्व-अस्तित्वात नव्हता. तसेच बेथलहेमात जन्म घेण्यापूर्वी तो कधींही देवाचा पुत्र म्हणून अस्तित्वात नव्हता.** भविष्यसंदेश रूपाने *''येणारा''* असाच त्याचा जुन्या करारात उल्लेख आढळतो. आणि त्या प्रत्येकवेळी देव त्याचा पिता आहे अशाच संदर्भ अर्थाने ते उल्लेख नेहमी करण्यात आलेले आहेत. कारण वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या

प्रकारांनी संदेष्ट्यांद्वारे पूर्वजांना प्रकट झालेला असा तो **शब्द** होता. (इब्री. १:१). प्रारंभी तो फक्त देवाच्या मनात **शब्द** आणि **भाकर** अशा अर्थी अस्तित्वात होता. तोच पुढे देवाचा पुत्र म्हणून स्वर्गातून खाली आला. (योहान ६) अनादि काळातील, भूतकाळांत तो त्या थोर अनंतकालिक आत्म्यात ***''बीज''*** रूपाने होता. म्हणजेच पित्याच्या उराशी होता. तोच देवाचा एकुलता एक पुत्र म्हणून आला (योहान १:१८), आणि काळाची पूर्णता झाली तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठविले. तो स्त्रीपासून जन्मलेला (झालेला) होता (गलती ४:४) याचा विचार करा : पुत्र जन्मण्यापूर्वी तो नेहमीच आपल्या पित्याच्या मांड्यात (पोटी) बीजरूपाने अस्तित्वात असतो. परंतु पुत्र (येशू) हा पित्यापेक्षा वेगळी व्यक्ति म्हणून पूर्वी अस्तित्वात नव्हती. तो फक्त बीजरुपाने पित्यामध्ये होता. **येशू हा देवाचा एकुलता एक *(Begotton)* पुत्र होता; अनंतकालिक पुत्र नव्हता,** हे ध्यानांत ठेवा. *''पित्याने पुत्राला पाठविले''* ह्या वचनांच्या आधारे बेथलहेमापूर्वी येशू हा पुत्र होता असा जे वाद घालतात त्यांच्यासाठी मी हे म्हणतो. बाप्तिस्मा करणारा योहान हा सुद्धा त्याच्या जन्मापूर्वी मनुष्य म्हणून होता कारण त्याच्याबद्दल सुद्धा असे शास्त्रवचन आहे, *''देवाने पाठवलेला एक मनुष्य होता, त्याचे नाव योहान होते.''* ह्या वचनाचे समर्थन त्यांना त्याच न्यायाने करावे लागेल.

आता हा जो दृश्य, देवाचा दूत होता तो दुसरा देव आणि तारणारा नव्हता. कारण देवाने असे जाहिर केले होते की,*''....मजवेगळा देव नाही; मजवाचून न्यायी व तारणकर्ता दुसरा कोणी देव नाही.''* (यशया ४५:२१)

संपूर्ण जुन्या करारात अदृश्य असणारा व संदेष्टयांना प्रकट झालेला हा दुसरा तिसरा कोणी नसून त्या त्या विशिष्ट वेळी तात्पुरत्या रूपात प्रकट झालेला देवाचा **आविष्कार (*THEOPHANY*)** होता. याची बहुतेक सर्व शास्त्राभ्यासकांना जाणीव आहे. तो देवाचा ***शब्द (LOGOS)*** होता, **म्हणजेच एका विशिष्ट प्रकारे *व्यक्त* व *प्रकट* झालेला देवाचा *विचार* व *मनोभाव* होता.**

त्या **थोर अनंतकालिक आत्म्याने** स्वतःशीच संकल्प करून त्याची कार्यवाही करण्याचा जो स्वहेतु अवलंबिला त्याची शास्त्रवचनानुसार निश्चिती करण्यासाठी **देवाचा जो शब्द *(Logos)*** त्याच्याकडे आपण अधिक बारकाईने लक्ष देऊ याः

# प्रारंभ

*''प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता.*

(योहान १:१)

***''प्रारंभी'' ''म्हणजे अनंत कालात नव्हे,'' तसेच ''सुरवातीविरहित''* असाही त्याचा अर्थ नव्हे.** ज्याप्रमाणे आकाश, पृथ्वी आणि दूतगण यांना प्रारंभ होता तसाच ***''शब्दाला''*** सुध्दा **प्रारंभ** होता. आणि हाच ***शब्द*** नंतर देही झाला आणि त्याने मनुष्यांमध्ये वस्ती केली.

***''शब्द''*** ही संज्ञा ग्रीक भाषेतील **लोगॉस** ह्या शब्दापासून आली आहे. त्याचा अर्थ **विचाराचे प्रकटीकरण** किंवा **व्यक्त केलेला विचार** असा आहे. फक्त विचार करणे (ग्रीक-नोएमा) किंवा बुद्धिवाद करणे (ग्रीक-डायलोगिस्मॉस) एवढाच मर्यादित अर्थ त्यामध्ये नाही. मनुष्य व त्याचे मन, (जेथे विचाराचे अधिष्ठान असते, ग्रीक-नूऊस) यांची फारकत करता येणे शक्य नाही, हे आपल्याला माहीत आहे. म्हणून जोपर्यंत **सर्वसमर्थ देव** आहे, तोपर्यंत त्याच्या ठायी **त्याचे** मन आहे.

गतकाळांतील अनादि काळांत कांहीहि अस्तित्वात येण्यापूर्वी फक्त सर्वसमर्थ देव होता. तो **स्वयंपूर्ण** होता. त्याचे सर्व विचार त्याच्या मनांत होते. परंतु ते व्यक्त करण्यात आले नव्हते. शब्दाचा आविष्कार करण्यात आलेला नव्हता, तो फक्त त्याच्या मनातच होता.

**अव्यक्त** किंवा **प्रकट न केलेला** (अनुच्चारित) **शब्द म्हणजेच विचार**. तो फक्त मनात असतो. उलटपक्षी **शब्द म्हणजे व्यक्त केलेला किंवा बोलून दाखवलेला विचार. आणि जे व्यक्त करण्यात आलेले असते ते शब्दांत किंवा कृत्यात असते.** म्हणून **लोगॉस** म्हणजे **विचार** अधिक **त्याचे व्यक्त रूप (किंवा प्रकटीकरण).** हेच साध्या शब्दात असे म्हणता येईलः **बोललेला शब्द** तसेच त्या **शब्दामागील बोलणारा** या सर्वांकडून **लोगॉसचा** पूर्ण अर्थबोध प्रकट होतो.

हे स्पष्टीकरण ध्यानात घेऊन ***''प्रारंभी शब्द (लोगॉस)*** *होता''* असे योहानाने का लिहिले हे आपण समजू शकतो.

प्रारंभीच्या त्या कालावधीपूर्वी फक्त **सर्वसमर्थ** आपल्या विचारांसह (लोगॉससह नव्हे) होता. परंतु स्वतःशीच सल्लामसलत **केल्यानंतर** आणि स्वतःच्या मनात हेतु मुक्रर **केल्यानंतर** त्यानुसार सर्वसमर्थ देव ते विचार व संकल्प **प्रकट करू लागला.** हे सर्व ''तो स्वतःच्याच इच्छेच्या सल्ल्यानुसार (ग्रीकः बूऊले) करू लागला.'' (इफिस १:११) आणि तेव्हांच तो शब्दाचा प्रारंभ होता. किंवा त्याच्या विचारांचे प्रकटीकरण होते. **देवाचा शब्द आकार घेऊ लागला.** आणि घटना घडू लागल्या!

(टीपः- कांही ईश्वरविज्ञान पंडित दोन देवांवर विश्वास ठेवतात. ते असे शिकवतात की योहान १:१ मध्ये ''***शब्द*** *देवासह होता*'' ह्या वाक्यांशातील ''*देव*'' हा शब्द हिब्रू भाषेत जसा '*याव्हे*' शब्द आहे तसा आला आहे. आणि '**एलोहिम**' ऐवजी 'याव्हे' हा शब्द वापरण्यात आल्याकारणाने ते (ईश्वरविज्ञान पंडीत) '*प्रारंभी*' ह्या शब्दाला फाटा देतात किंवा त्याची पायमल्ली करतात व **लोगॉस** हे वेगळे आत्मरूपी अस्तित्व होते व अनंतकाळांत तो **सर्वसमर्थ आत्म्याबरोबर (एलोहिम)** सहवास्तव्य करीत होता, असे समर्थन करतात. त्र्यैक्यवाद्यांप्रमाणे हे द्वैतवादी सुध्दा लोगॉसला ''*एलोहिम परिवारातला दुसरा सदस्य*'' मानतात. (अशाप्रकारे अनेकदेव आहेत असे शिकवण्याचा प्रयत्न करणारे सिध्दांत **मोशेप्रणीत निवास मंडपाच्या**

नमुन्याचे प्रतिबिंबीत (परावर्तीत) करण्याच्या बाबतीत तोकडे पडतात. हे आपण नंतर पाहाणारच आहोत).

# ''एकमेव अंतर्गत बीज''
# देवाच्या उत्त्पत्तीचा प्रारंभ

बार्कलेच्या भाषांतरांत योहानाच्या शुभवर्तमानातील पहिल्या पाच वचनांचा अनुवाद येणेप्रमाणे आहेः *''जगाची सुरवात झाली तेव्हा शब्द हा अगोदरच तेथे होता. शब्द देवासह होता, आणि शब्दाचे स्वरूप किंवा स्वभाव हा देवाच्या स्वभावासारखाच होता. प्रारंभी शब्द देवासहच होता. शब्द ह्या साधनाद्वारे किंवा माध्यमाद्वारेच सर्व कांही अस्तित्व आले. शब्दाव्यतिरिक्त एकहि बाब अस्तित्वांत आली नाही. संपूर्ण उत्त्पत्तीच्या बाबतीत बोलायचे झाले तर त्यामध्ये शब्द हे जीवन तत्व होते. आणि तें जीवन मनुष्यांचा प्रकाश होते. तो प्रकाश सातत्याने अंधारांत प्रकाशत असतो, आणि अंधःकाराने त्याला कधीच विझवलेले नाही.''*

जेणेकडून सर्व कांही अस्तित्वांत आले त्याचे साधन किंवा माध्यम म्हणजे **शब्दच** होता. शब्दाशिवाय काहींच अस्तित्वांत येऊ शकत नव्हते किंवा उत्पन्न केले जाऊ शकत नव्हते. **''कारण शब्द देव होता.''** तो **(शब्द)** देवासह असल्याकारणाने त्याच्यापेक्षा कुठल्याच बाबतीत कमी असू शकत नव्हता निःसंशयपणे **शब्दामध्ये जीवन** होते. ते अद्यापही आहे. येशू म्हणाला *''....मी जी वचने तुम्हांस सांगितली आहेत ती आत्मा व जीवन आहेत.''* (योहान ६:६३).

देवाच्या उत्त्पत्तीचा जो प्रारंभ **(शब्द)** त्याच्या पासूनच सर्व कांही आल्यामुळे आणि जीवनाचा केंद्रवर्ती विषय तोच असल्याकारणाने आपण फक्त एवढेच म्हणू शकतो की जे जीवन सर्वसमर्थाच्या **उराशी** होते त्या **जीवनाचे बीज शब्द** होता. देवाच्या ठायी किंवा **देवाच्या अंतर्गत असणारे बीज** (*Monogene of God*) अशी संज्ञा आपण त्याला देऊ शकतो. आपल्याला आपले पवित्र शास्त्र ठाऊक असेल तर आपल्या लक्षात आले असेल की हाच **शब्द** अंशाअंशांनी आणि प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्या द्वारे (ग्रीकः संदेष्ट्यांमध्ये) संपूर्ण जुन्या करारात पूर्वजांना प्रकट करण्यात आला होता. *''त्या प्रत्येक प्रकटीकरणाच्या आविष्काराने त्या सत्याचे एकेक अंग विविध प्रकारे स्पष्ट केले''* (इब्री १:१). परंतु देव *''या काळाच्या शेवटी आपल्याशी पुत्राच्या द्वारे (ग्रीक-पुत्रामध्ये) बोलला आहे. हा त्याच्या गौरवाचे तेज, व त्याच्या* ***तत्वाचे*** *(Substance) प्रतिरूप आहे''* (इब्री १:३).

ठीक आहे, देवाचा शब्द (*Logos*) जुन्या करारातील संदेष्ट्यांस अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी प्रकट करण्यांत आला होता. तो केवळ त्यांना व्यक्त करण्यांत आला होता, तो त्यांनी ऐकला होता, एवढेच नव्हे तर देवाच्या त्या पवित्र पुरूषांस तो प्रकट करण्यांत आला होता. त्यांनी तो पाहिलाहि होता. त्या प्रत्येक **प्रकटीकरणाच्या**

प्रसंगी तो **शब्द** त्यांना एका विशिष्ट पध्दतीने व प्रकाराने दाखवण्यांत आला होता. तेणेकडून त्या शब्दाचे परिपूर्ण, अंतिम स्वरूप म्हणून **जो ख्रिस्त** (येशू) येणार होता व शब्दाने सांगितलेल्या सर्व शास्त्रलेखांची पूर्णता करणार होता, **त्याच्याबद्दल ते पूर्वचित्रण व पूर्वसूचित (विवरण) होते.**

# शब्द व येशू

***येशू*** आणि ***शब्द*** यांचा आपणांस ***उलगडा*** व्हावा, अशी मी प्रार्थना करतो. प्रारंभी येशू हा **शब्द** होता आणि सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी तो देहधारी झाला, असा अनेक पवित्र शास्त्राभ्यासकांचा समज आहे व आम्हीहि त्यांच्यासारखाच विश्वास धरावा अशी ते इच्छा करतात. परंतु शब्द हा येशू होता असे म्हणण्याने **दोन** देव होतात. **शब्द हा येशू नव्हता.** तरीपण, **येशू हा देहात प्रकट झालेला देवाचा शब्द होता.** प्रारंभी देवासह येशू नसून *शब्द* होता. आणि तो *शब्द* मूळचे आंतरिक बीज ***'Monogene'*** *(SEED)* असून **स्वतःला व्यक्त** (प्रकट) करण्यासाठी तो देवामधून बाहेर आला. तो अनंतकालिक आत्म्यामधून बाहेर आल्याकारणाने तो **शब्द** अनंतकालिक होता व आहे. परंतु येशू हा मनुष्य जन्मला व उत्पन्न केला असल्याने अनंतकालिक नव्हता. **शब्द**, जो देवाच्या **मनातून** बाहेर आला तो ***ख्रिस्ताचे परिपूर्ण पूर्वसूचित चित्रण होता.*** आपल्याला हा उलगडा नसेल तर प्रारंभी *शब्द* हा येशू होता असेच आपणांस वाटेल. परंतु येशू, जो (सुमारे दोन हजार वर्षापूर्वी) देहात येणारा देवाचा *शब्द* होता, तो देवाच्या *मनांत* किंवा *उराशी* होताच. आणि जग होण्यापूर्वी देवाने त्याला **गौरविले** (योहान १७:५) देवाच्या सार्वभौम इच्छेनुसार पृथ्वीचा पाया घालण्यापूर्वी तो **वधस्तंभी दिलेला** आणि **वधलेला** कोकरा होता (प्रकट १३:८) त्याने आपल्या मनाच्या संकल्पानुसार त्याच्या *शब्दाची* योजना केली. (इफिस १:११) व जे *अस्तित्वात* नाही त्यास ते असल्यासारखी आज्ञा करतो (रोम ४:१७) एवढेच काय, देवाचे उध्दरलेले जण ह्या नात्याने आपण प्रेमामध्ये त्याच्या दृष्टीने *पवित्र* व निर्दोष व्हावे, म्हणून त्याने *सृष्टीच्या स्थापनेपूर्वी* आपल्याला ख्रिस्तामध्ये *निवडले* (इफिस १:४) आणखी काय, देवाच्या मनात हे निश्चित झाल्याकारणाने आम्हालाहि त्याने *गौरविले* (रोम ८:२९-३०) होय, देवाच्या पूर्वज्ञानानुसार त्याची **उध्दाराची योजना** ठाम (मुक्रर) करतांना त्याने अशाप्रकारे **पूर्वनिवड** व **पूर्वनियुक्ति** केली. ती अशी की काळाची सुरवात होण्यापूर्वी त्याने आपल्या भावी पुत्र-कन्यांची नावे *कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात* लिहिली. (प्रकटी १३:८).

विल्यम ब्रॅनहॅम संदेष्ट्याच्या शब्दांत हेच स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देण्यांत आले आहे : ते म्हणतात, *''थोर अनंतकालिक आत्मा थिऑफनी म्हणजे तात्कालिक दृश्य अशा शरिररूपी दिशेने स्वतः आकार घेऊ लागला. त्याला शब्द म्हणतात. त्याला शरीर म्हणता येईल. तो आब्राहामाला भेटला तेव्हा अशाच शरीर-अवस्थेत होता.*

*त्याला मलकीसदेक म्हणण्यात आले होते. त्यावेळी तो थिऑफनी म्हटलेल्या तात्कालिक दृश्य अशा शरीर-अवस्थेत होता.''* (उत्पत्तिमध्ये) हा थोर आत्मा आकार घेऊ लागला आणि त्याच्यामधून बाहेर गेलेला *लोगॉस 'देवाचा पुत्र होता.' आत्म्याचा* जो एकमेव *दृश्य* आकार होता तो हाच. आणि तोहि थिऑफनी असाच होता. त्याचा अर्थ एक *शरीर* आणि ते *शरीर* मनुष्यासारखे होते. *''आता, कोणाहि मनुष्याने पित्याला कधीच पाहिले नाही; कोणीहि मनुष्य देवाला पाहू शकत नाही, कारण देव शरीर रूपात नाही, देव आत्मा आहे.... त्यानंतर थोड्या वेळाने मी एक पवित्र प्रकाश आकार घेत असल्याचे पाहू लागलो. तो आकार कांहीसा प्रकाश वलयासारखा दिसला, तुम्ही तो केवळ आत्मिक नेत्रांनी न्याहाळू शकता....ते काय होते? पवित्र शास्त्राचे वाचक त्याला 'लोगॉस' किंवा 'अभिषिक्त' किंवा 'अभिषेक' अशी नावे देतात. देवाचा एक अंश कशात तरी विकसीत होऊ लागला, यासाठी की ते काय आहे याची मानवप्राण्याला साधारण कल्पना तरी यावी. तो देवाचा शब्द होता.''*

देव **आत्मा** आहे, तो अगदी तसाच आहे. **शब्द** जरी देव आहे तरी संपूर्ण देव तो शब्द नाही. ईश्वरविज्ञानाच्या दृष्टीने आपण तें असे म्हणू शकतो: **एलोहिमचा** आत्मा हा अधिक मोठा भाग आणि त्याचा शब्द हा अधिक लहान भाग होय. (कारण नंतरचा जो आहे तो पहिल्यामधून निघतो) हा जो अधिक लहान भाग तो देवाचा दृश्य भाग किंवा दृश्य बाजू आणि तोच मनुष्य झाला. म्हणून, शब्द हा **स्वर्गाचा प्रभु** किंवा **धनी** आहे. (१ करिंथ १५:४७, योहान ३:१३)

***देवाचा विचार व बोलणे म्हणजेच त्याचा शब्द 'देवाच्या उत्पत्तीचा प्रारंभ' म्हणून आत्मिक-शरीर रूपाने त्याच्यातून बाहेर निघाला. (तोच देवाच्या उत्पत्तीची सुरवात करणारा किंवा उत्पतीचा कर्ता होय.) तो सर्व उत्पत्तीत प्रथम जन्मलेला, पुष्कळ बंधुजनात प्रथम जन्मलेला असा होता.*** ह्या शब्दरूपी किंवा आत्मा-रूपी शरीरा व्दारे देव स्वतः आकारबध्द ***('en morphe')*** होऊन आपले सेवक जे संदेष्टे ह्यांना दृश्य झाला. अशा प्रकट होण्यास (*Manifestation*) आपण *'थिऑफनी'* रूप असे म्हणतो.

आब्राहामाने आपणांस आशिर्वाद देणाऱ्या **मलकीसदेकास** परात्पर देवाचा याजक म्हणून ओळखले व आपल्या जवळील सर्वस्वाचा दशमांश त्याला दिला. (उत्पत्ति १४:१७-२०) तो दुसरा तिसरा कोणी नसून **देवाचा शब्द** आहे हे त्याने ओळखले. मलकीसदेक हा कांही येशू नव्हता. परंतु तो ख्रिस्ताच्या मुख्य याजकीय सेवेचा पूर्वनमुना होता. इब्री ७:३ मध्ये पौलाने म्हटले आहे, *''मलकीसदेकाचा बाप, आई, वंशावळ, जन्मदिवस व आयुष्याचा शेवट ही सांगितली नाहीत.''* पण येशूला ह्या सर्व गोष्टी होत्या. म्हणून तो केवळ देवाचा दृश्य भाग असू शकत होता. तो देवाचा शब्द, त्याचा *व्यक्त झालेला विचार* जो आब्राहामाकडे आला. कालांतराने

मम्रेच्या राईंत तीन *पुरूषांनी* आब्राहामाला भेट दिली. त्यांच्यातील दोघेजण अदृश्य आत्मारूपी दिव्यदूत होते. दृश्य होण्यासाठी त्यांनी मानव सदृश्य आकार धारण केलेला होता. आब्राहामाने त्या तिसऱ्या *पुरूषाला* ओळखले व त्याला त्याने **प्रभु** असे संबोधले. आब्राहामाशी सहभागिता करण्यासाठी व त्याच्याबरोबर भोजन करण्यासाठी ***प्रभु-देवाचा शब्द*** दृश्य झाला होता. (उत्पत्ती १८) हाच *पुरूष* (प्रभूचा दूत-निरोप्या) मोशाला जळत्या झुडुपातून प्रकट झाला होता. (निर्गम ३) प्रभूच्या इतर सर्व संदेष्ट्यांस व सेवकांस त्यांच्या त्या त्या काळात हाच प्रकट झाला होता.

# त्याचे निर्मितीकारक स्व-प्रकटीकरण

देवाचा *शब्द* (ग्रीक-लोगॉस, हिब्रू-डाबार) यामध्ये तोंडी किंवा मौखिक उच्चारापेक्षा अधिक अर्थ सामावलेला आहे, हे आता आम्हाला समजते. हे **त्याचे निर्मितीकारक स्वत:चे प्रकटीकरण** आहे. ***''देवाची जगाकडे वळलेली बाजू,''*** असेही त्याचे वर्णन किंवा विवरण करता येईल. योहानकृत शुभवर्तमानाच्या प्रस्तावनेवरून आम्हाला हेहि समजते की *लोगॉस* हे अविचारी, अव्यक्तिवाचक, निर्मितीकारक जीवन-तत्व किंवा शक्ति नाही. तर **येशू** ख्रिस्तामध्ये *जिवंत देवाचा झालेला व्यक्तिवाचक आविष्कार* असा तो आहे. येशू हा देवाच्या *शब्दाचे* मूर्तिमंत रुप आहे, तो दैवी प्रकाश आणि दैवी जीवनाचे *मूर्त स्वरूप* आहे, तसेच तो मानवी व्यक्तिमत्वामध्ये प्रकट झालेले गौरव व सत्य आहे. (योहान १:४,९; तुलना १ योहान १:१-४).

*शब्द* हा येशू नव्हता; हे मी अगोदरच म्हटले आहे. आणि योहानाच्या लिखाणावरून *शब्द देव* होता. येशू हा जो *''अदृश्य देवाची प्रतिमा''* तो प्रकट करण्यात आलेला *शब्द* होता. येशू हा *देवाचे प्रकटीकरण* होता. तो ***ख्रिस्त*** होता, तो ***देवाचे प्रकट झालेले गूज*** होता. तो देवाचे *बीज* होता. म्हणजेच देवाचे 'आंतरिक बीज' होता. तो पित्याच्या *उराशी* असणारा देवाचा *एकुलता एक पुत्र* होता.

*शब्द* हा दुसरा *आत्मा* किंवा दुसरा *देव* नव्हता. स्वत:साठी देवाची लेकरे अस्तित्वांत आणावीत अशा तऱ्हेचा स्वसंकल्प व हेतुपुर:सर योजना त्याने स्वत:मध्येच केली होती. आणि या कारणास्तव उत्पत्ती करून जीवन अस्तित्वात आणण्यासाठी ***शब्द-बीजाची*** आवश्यकता होती.

बीज आपल्यासारखेच बीज निर्माण करील हे आपल्याला माहीत आहे, तो देवाचा नियम आहे (उत्पती १:११-१२;२४-२५). उदाहरणार्थ, सफरचंदाच्या बीजाची लागवड केल्यानंतर त्याच्यापासून सफरचंदाचे झाड येईल आणि कालांतराने त्याला सफरचंदाच्या बियायुक्त अशी सफरचंदाची फळे येतील. जमिनीत लागवड केलेल्या म्हणजेच भूमित प्रविष्ट झालेल्या सफरचंदाच्या त्या बीजाचे मूळ हे त्याच्या 'मूळच्या

बीजामध्ये' होते. म्हणून लाक्षणीक अर्थाने आपणांस असे समजते की ***शब्द** हा देवाचे आंतरिक किंवा **अंतर्गत मूळचे बीज** होता. आणि तो देव होता.*

# बीज नाही, जीवन नाही

सफरचंदाचे बीज एकदा जमिनीत लावले की मग त्याच्या पुढील अवस्था क्रमाक्रमाने विकसित होत जातात, हे आपण जाणतो. पहिल्यांदा त्याला अंकुर फुटेल; त्यानंतर पाने येतील. त्यापुढील अवस्था म्हणजे खोड फांद्या वगैरे. मग फुले येतात व कांही दिवसांनी कोमेजून जातात, पण त्याच्या निकटच असणारे पुष्पबीजोत्पादक भाग किंवा स्त्रीकेसर मोठे होऊन बीजासहित फलधारणा होते. आणि हे बीज आरंभी पेरलेल्या मूळच्या बीजासारखेच तंतोतंत असते. बीज हे त्या उत्पादनाचा आरंभ असतो. त्याची पेरणी किंवा लागवड केल्यानंतर विकास अवस्थेतून जातांना त्याला बऱ्याच पायऱ्या ओलांडाव्या लागतात. पण अखेर तें तंतोतंत स्वत:समान असणाऱ्या बीजावस्थेलाच पोचते. यावरून आम्ही समजतो की देवाचे *बीज* ह्या नात्याने *शब्द (लोगॉस)* हा देवाच्या उत्पत्तीचा प्रारंभ म्हणून बाहेर आला. तोच शब्द पूर्वजांना व संदेष्ट्यांना वेगवेगळ्या प्रसंगी व विविध प्रकारांनी प्रकट झाला होता. (आणि ह्या शेवटच्या काळांत इब्री.१:२) आम्हाला तो *पित्याचा एकुलता एक पुत्र (आंतरिक बीज)* म्हणून प्रकट झाला. देवाचा पूर्ण शब्द हा देवाच्या पुत्रात होता. म्हणून येशू हा देवाचा ***शब्द*** होता (१पेत्र १:२३-२४).

आता आपला हेतु प्रकट करण्यासाठी देवापासून किंवा देवामधून ***बाहेर आलेला*** हा शब्द (लोगॉस) मानवी रूपात व्यक्त किंवा प्रकट करण्यांत आला. ***लोगॉस हा आत्मा*** होता. जेव्हा जेव्हा तो देवापासून आला तेव्हा तेव्हा त्याचे नियुक्त किंवा नियोजित कार्य पूर्ण झाल्याबरोबर तो परत देवाकडे जात असायचा. ज्या ज्या वेळी तो दिसला तेव्हा तें त्याचे दिसणे (*Appearance*) एक तर पार्थिव शरीरासारखे (*Corporeal*) किंवा दृष्टांतमय स्पर्श न करता येण्याजोगे (*Non-tangible*) अशा रूपात होते. ***ते प्रत्येक स्वरूप (दिसणे) हे ख्रिस्ताचा पूर्वनमुना किंवा पूर्वचित्रण असे असून ते फक्त तात्पुरते आणि त्या त्या स्थानापुरते मर्यादित असे होते.*** एकदा तो ***मलकीसदेक*** (देवाचा प्रमुख याजक) कसा होता हे आपण पाहिले. तर दुसऱ्या प्रसंगी तो इस्त्राएलाचा ***शास्ता*** व ***उध्दारकर्ता*** होता. त्यानंतर आब्राहामाशी हितगुज करणारा व सहभागिता घेणारा त्याचा ***मित्र*** असा होता हेहि सर्व आपण पाहिले आहे.

*लोगॉस* हा देवाचे आंतरिक *बीज* असल्याकारणाने देवाने आपल्या उरातून स्वप्रकटीकरण करण्यासाठी बाहेर आणून पितृत्व हा आपला गुण व्यक्त करण्यासाठी जे केले, ते *पित्याचा पुत्र* यापेक्षा कुठल्याच बाबतीत कमी असू शकत नव्हते. ***पित्याचा एकुलता एक पुत्र, देवाच्या उत्पत्तीचा प्रारंभ, अदृश्य***

***देवाची प्रतिमा, सर्व उत्त्पतीत प्रथम जन्मलेला,*** म्हणजेच स्वतःकरता कुटुंब किंवा परिवार उत्त्पन्न करण्याची ***एलोहिमची*** ही खास योजना व रीत होती. हेच ते *''सुभक्तीचे गुजः देव देहात प्रकट झाला, आत्म्यांत नीतिमान ठरला, देवदूतांच्या दृष्टीस पडला, राष्ट्रांत त्याची घोषणा झाली, जगात त्याजवर विश्वास ठेवण्यात आला, तो गौरवात वर घेतला.''* कोणतीहि बाब अस्तित्वात येण्यापूर्वी सर्वसमर्थाच्या मनात ही योजना झाली, आणि प्रभू ख्रिस्त येशू, आपला तारणारा याच्यामध्ये ती योजना साकारली किंवा कार्यवाहीत आली. **''देवाचा पुत्र'' येशू ख्रिस्त हा देहात प्रकट झाला. मानवी देहात आविष्कारित झालेला तो देवाचा *शब्द* होता. *सर्व बाबतीत त्यालाच सर्वश्रेष्ठत्व होते.***

## जसा पिता, तसा पुत्र

जुन्या करारामध्ये ज्या ज्या बाबींचा सबंध देवाशी जोडण्यात आलेला आहे ती प्रत्येक बाब येशू मध्ये परावर्तीत किंवा प्रतिबिंबित झालेली आहे. उदाहरणार्थ जुन्या करारात देवाला *राजा* म्हणून संबोधण्यात आलेले आहे. (स्तोत्र ५:२; यिर्मया १०:१०; जखऱ्या ९:९). येशू जगात आला तेव्हा *राजा* म्हणून त्याला नमन करण्यात आले; त्याची भक्ति करण्यात आली. (मत्तय २:२) तसेच तो आपल्या वैभवी राजासनावर बसेल तेव्हा तो राजा असणार आहे (मत्तय २५:३१-३२;१ तिमथ्य १:१७; प्रकटी ११:१७;१५:३). देव *न्यायधीश* आहे असे आपण वाचतो (स्तोत्र ५८:११ यशया ३३:२२). आणि येशू हाच *न्यायधीश* आहे (योहान ५:३०; प्रकटी १९:११). देव हा *उध्दारक* आहे (स्तोत्र १९:१४;यशया ४३:१४), येशूही तसाच आहे (गलती ३:१३, इब्री ९:१२) देव हा *''मी आहे''* (निर्गम ३:१३-१४; यशया ४४:६ब), येशूनेहि *''मी आहे,''* असा दावा केला (योहान ८:२४; ५७-५८; प्रकटी १:१७-१८). पवित्र शास्त्रांतील ही सर्व व इतर उदाहरणे दोन व्यक्तींची साक्ष देत नाहीत. उलटपक्षी प्रभु येशू हा खुद्द देहात आलेला देव आहे हेच सिध्द होते. पौलाने हेच ठामपणे सांगितले: ज्याने सर्व कांही उत्पन्न केले तो **एकच देव** आहे, तो पिता आहे. आणि **एकच प्रभु** येशू ख्रिस्त आहे ज्याने सर्व कांही उत्पन्न केले. या संदर्भात पौल असे लिहितो: *''तरी आपणाला एकच देव म्हणजे पिता आहे, त्याजपासून अवघी आहेत व आपण त्याच्यासाठी (त्याच्याठायी) आहो. आणि आपल्याला एकच प्रभु येशू ख्रिस्त आहे, त्याच्याद्वारे अवघी आहेत व आपण त्याच्याद्वारे आहो.'' (१ करिंथ ८:६)* देव पिता, देव आहे, आणि पुत्र, जो प्रभु आहे तो सुध्दा देवच आहे (तुलना प्रकटी ४:११)

## ख्रिस्त

*त्र्यैक्याचा* सिध्दांत सिध्द करण्याच्या प्रयत्नांत कांही त्र्यैक्यवाद्यांनी तर १ करिंथ १०:१-११ ह्या वचनांतील *'ख्रिस्त'* या शब्दाचा (करिंथ येथील मंडळीला

इशारा देतांना इस्त्राएल लोकांनी जशी *ख्रिस्ताची* परीक्षा पाहिली तसे तुम्ही होऊ नये असे म्हटले आहे) आधार घेऊन ते म्हणतात *येशू पूर्वी अस्तित्वात* होता कारण इस्त्राएल लोकांमागे चालणारा *''तो आध्यात्मिक खडक''* होता.

*''ख्रिस्त''* हा शब्द पवित्र शास्त्रात नेहमीच ख्रिस्त येशू ह्या मनुष्याचा निर्देश करीत नाही. याचा पडताळा मत्तय २४:५ व तत्सम वचने वाचून येऊ शकतो. त्या ठिकाणी ह्या जगात येणाऱ्या *खोट्या ख्रिस्तांबद्दल* व *खोट्या अभिषिक्तांबद्दल* येशू बोलतो. तसेच येशू या नावाने ओळखली जाणारी पुष्कळ माणसे ह्या जगात आहेत. परंतु ज्याला ***''ख्रिस्त'' (THE CHRIST)*** म्हटले आहे असा केवळ एकच आहे.

**ख्रिस्त** ह्या शब्दासाठी ग्रीकमध्ये ***''ख्रिस्टॉस''*** असा शब्द असून त्याचा अर्थ **अभिषिक्त** किंवा अभिषेक केलेला असा आहे. देवाच्या संदेष्ट्यांना देवाचे अभिषिक्त असे म्हटले आहे. त्याचा अर्थ *देवाने अभिषेक केलेले* आणि *अभिषेक* हा फक्त देवाच्या *आत्म्याकडून (लोगॉस)* होत असतो.

प्रेषित २:३६ मध्ये पेत्राने म्हटले आहे, *''....ज्या येशूला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले त्याला देवाने* ***प्रभु*** *व* ***ख्रिस्त*** *करुन ठेवले आहे.''* आता येशू हा आत्मा म्हणून पूर्वी अस्तित्वांत असता तर मग त्याला **प्रभु** व **ख्रिस्त** करण्याची देवाला काय गरज होती? आणि येशू हा देव (जो पिता) याच्याहून निराळा असा स्वतंत्र व्यक्तिगत आत्मा (दुसरी व्यक्ती) म्हणून पूर्वी अस्तित्वात असता तर मग देव हा जो आत्मा होता त्या आत्म्याला **ख्रिस्त** हे शीर्षक देणे *विरोधाभास* ठरला नसता का? फक्त देवच अभिषेक करतो. त्याला अभिषेक केला जात नाही. फक्त उत्पन्न केलेल्या व्यक्ति व वस्तूंना अभिषेक करण्यात येतो. म्हणून येशू हा **मनुष्य** असल्याकारणाने त्याला देव जो त्याचा पिता त्याच्याकडून अभिषेक करण्यांत आला.

ह्या कारणास्तव तो *आध्यात्मिक* खडक हा दुसरा तिसरा कोणी नसून *अभिषिक्त* असा *'डाबार' (शब्द)* होता जो सर्वसमर्थ देवाचा आत्मा याच्यापासून वाहत होता. कशासाठी? इस्त्राएल लोकांना रानात त्यांचे आत्मिक अन्न व पाणी यांचा पुरवठा करण्यासाठी. तो खडक म्हणजे तोच *ख्रिस्त (अभिषिक्त शब्द)* होता ज्याचे भागिदार (उपभोक्ते) आता प्रत्येक निवडलेली व्यक्ती आहे.

# देहधारण (अवतार)

आता योहान १:१४ कडे बारकाईने लक्ष द्या *''शब्द देही झाला....त्याने आम्हामध्ये वस्ती केली.''* बऱ्याचवेळा असे म्हटले जाते, *''आत्मा देही झाला''* किंवा *''देव देही झाला.''* अशाप्रकारची विधाने सामान्यपणे गृहित धरण्यात येतात. त्यामुळे ख्रिस्ती लोकांची पुढीलप्रमाणे चुकीचे तात्पर्य काढण्याकडे प्रवृत्ति होते : मनुष्य बनण्यासाठी तो थोर अनंतकालिक सर्वसमर्थ आत्मा नाहीसा झाला. याच्याइतकीच भयप्रद त्रैक्यवादी समजूत असे दर्शवते की देव जो पुत्र म्हटलेल्या दुसऱ्या व्यक्तीने

मानवी योनीत कुमारी मरियेच्या उदरी देवाचा पुत्र म्हणून जन्म घेण्यासाठी स्वतःचे रूपांतर केले. अशाप्रकारच्या भ्रष्ट शिकवणुकींना पवित्र शास्त्रांत मुळीच आधार नाही.

**वास्तविक पहाता देवाचा शब्द म्हणजेच त्याचे दृश्य स्वरूपातील स्वतःचे जे प्रकटीकरण ते देहधारी झाले.** देवापासून निघालेले ***शब्द-शरीर*** (*WORD-BODY*) जे जुन्या करारातील वेगवेगळ्या संतजनांना **तात्कालिक-दृश्य स्वरूपांत (temporary** *THEOPHANY* forms) प्रकट झाले होते, ते पूर्णपणे नाहीसे झाले होते. बेथलहेम येथे ते संपुष्टात आले कारण **शब्द** हा **कायमस्वरूपी मानवी रूप (Permanent *HUMAN FORM)*** धारण करण्याकरता आला होता. ''कारण आम्हासाठी बाल जन्मला आहे, आम्हास पुत्र दिला अहे.'' (यशया ९:६अ) हाच देवाचा ***परिपूर्ण शब्द होता.*** ''शब्द देही झाला आणि त्याने आम्हामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले. ते गौरव पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे असावे असे होते. ते कृपा व सत्य यांनी परिपूर्ण होते.''(योहान १:१४) ***''शब्द देही झाला.'' खुद्द देव–येशू ह्या मनुष्यांत अवतरला (Incarnated) तेव्हाच शब्द देही झाला.*** हे सर्व यार्देन नदीत लोकांच्या समुदायासमोर घडले. (टीप :- या ठिकाणी 'अवतरणे' हा शब्द इंग्रजीतील (Incarnate) असून तो लॅटीन भाषेतील *"Incarnare"* ह्या शब्दापासून आला आहे. त्याचा अर्थ 'देहाने पांघरणे *(To clothe with flesh)* असा आहे).

> *''मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू पाण्यातून लागलाच वर आला आणि पाहा, आकाश उघडले (योहानासाठी) तेव्हा त्याने (योहानाने) देवाचा* ***आत्मा*** *कबुतरासारखा उतरतांना व त्याजवर (येशूवर) येतांना पाहिला; आणि पहा, अशी आकाशवाणी झाली की हा माझा पुत्र, मला परमप्रिय, याजवर मी संतुष्ट आहे.''* (मत्तय ३:१६,१७)

*''सर्व पूर्णता त्याच्यात वसावी... हे पित्याला बरे वाटले''* कलस्सै १:१९, (तुलना - योहान १४:१०, कलस्सै २:९)

यशया ९:६ या भविष्यसंदेशानुसार पापासाठी यज्ञ म्हणून दिला जाण्यासाठी **पुत्र** आहे, ***बाळ नाही,*** हा सूक्ष्म भेद लक्षात घ्या. (तुलना. योहान ३:१६-१८) आणि म्हणून येशू हा *अभिषिक्त मनुष्य* याला *शेवटचा आदाम* किंवा *दुसरा मनुष्य* असे म्हटले आहे. त्याची (येशू ह्या अभिषिक्त मनुष्याची) तुलना पहिला आदाम किंवा पहिला मनुष्य याच्याशी केली आहे. तो (पहिला आदाम) उत्पन्न करुन मनुष्य असा बनवण्यांत आला होता. तो देवाचा पुत्र असा होता - बाळ नव्हता.

**देवाचा पुत्र** हा मानवजातीची सेवा करण्यासाठी संदेष्ट्याची सेवा घेऊन सेवक (Servant)असा आला (तुलना. यशया ४२:१, मत्तय १२:१७-२१,२०:२८) म्हणूनच **'मनुष्याचा पुत्र'** हे त्याचे एक नामाभिधान किंवा शीर्षक आहे, देवाचे *वचन* (देवाचा शब्द) देण्यासाठी त्याला अभिषेक करण्यात आला होता. ''*प्रभूचा आत्मा मजवर आला आहे, कारण दीनांस सुर्वात सांगण्यास त्याने मला अभिषेक केला;*

*धरून नेलेल्यांची सुटका व आंधळ्यास दृष्टी ही विदित करावयास ठेवलेल्यांस मोकळे करावयास, प्रभूच्या प्रसादाचें वर्ष विदित करण्यास त्याने मला पाठविले आहे.''* (लूक ४:१७-१८; यशाया ४२:६-७; ६१:१). तसेच योहान १:३२; ३:३४).

योहान १७:३ मध्ये येशूच्या प्रार्थनेत एक फारच महत्वाचे विधान आढळते. *''सार्वकालिक जीवन हेच आहे की त्यांनी, जो तू एकच सत्य देव त्या तुला, व ज्याला तू पाठवले, त्या येशू ख्रिस्ताला ओळखावे.''* त्या विधानात एकच देव आहे आणि येशू ख्रिस्त जो प्रत्यक्ष प्रकटीकरण म्हणून पाठवण्यात आला होता, हे निःसंदिग्धपणे सांगितले आहे. हा विश्वास अशा तऱ्हेने ध्वनित करण्यात आला आहे; *''जो पुत्रावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन आहे; परंतु जो पुत्राला मानीत नाही त्याच्या दृष्टीस जीवन पडणार नाही.''* (योहान ३:३६; तुलना इब्री १:३).

**आता येशू ख्रिस्त ही देवाची *प्रतिमा* (कलस्सै १:१५) आणि *देवपणाचें सर्व पूर्णपण शरीररूपाने* (कलस्सै २:९ रमाबाई भाषांतर). असल्याकारणाने (त्याच्या विचाराचे मूळ स्वरुप व सातत्य न बिघडवता किंवा विपर्यस्त न करता) देवाला येशूव्यतिरिक्त आपले स्वतःचे प्रकटीकरण करणे अशक्यप्राय आहे. (म्हणजेच येशू व्यतिरिक्त आपले स्वतःचे परिपूर्ण प्रकटीकरण करावयाचे असेल तर देवाला आपला मूळ विचार, त्याचे सातत्य आणि त्यासंबंधी त्याने आपल्या *मनांत* केलेला *पूर्वसंकल्प* ही सर्व विपर्यस्त किंवा वेडीवाकडी करावी लागतील).**


**येशू ख्रिस्तामध्ये देवत्वाची पूर्णता देहात वसली होती *याचा अर्थ* सर्वसमर्थ आत्म्याने स्वर्ग हे आपले निवास पूर्णपणे सोडून दिले (रिक्त केले) होते, *असा नाही.*** देव हा आत्मास्वरूपी (*SPIRIT being*) असल्याकारणाने नेहमीच *सर्वव्यापी* किंवा सर्वत्र असणारा आहे, (कारण तो **सर्वसमर्थ आणि सर्वज्ञ** आहे.) म्हणून संपूर्ण देव ख्रिस्त येशूमध्ये नव्हता. तर **देवात जे सर्व कांही होते *ते सर्व ख्रिस्त येशूमध्ये*** होते. हेच इंग्रजीत असे म्हटले आहे : *(Not all of God was in Christ Jesus, but all that God was, was in Christ Jesus)* येशूचे शरीर हे केवळ देवाच्या वास्तव्याचे ठिकाण आणि पूर्ण प्रतिनिधीत्व असे होते. हेच दुसऱ्या शब्दांत असे सांगता येईलः **देवाने आपला आत्मा पुत्रामध्ये अपरिमित असा ठेवला** *(God put his spirit without measure in the Son)* म्हणून येशू हा **देवाच्या स्वभाव गुणांचे** *(attributes)* **परिपूर्ण प्रकटीकरण होता.** मलाखी ३:१;

# देह—मानवता

*''शब्द हा मानवप्राणी झाला आणि काही काळाकरता आम्हामध्ये राहिला.''* योहांन १:१४ (बार्कलेच्या भाषांतराचा आशय)

*शब्द* देव होता, याचा अर्थ मांसमय शरीर म्हणजे देव होता असा होतो का?

# अदृश्य आत्मा
# दृश्य लोगॉस




सुचना:


देव मनुष्य नाही
देव मनुष्य झाला नाही
देव देह बनला नाही

शब्द मनुष्य बनला
शब्द देही झाला

देव देहात प्रकट झाला
देव ख्रिस्त येशूत होता

...देव त्याच्या शब्दात व शब्द येशू ख्रिस्तात...

# लोगॉस : देवाच्या सृष्टीचे आदिकारण



*नाही.* येशूचे शरीर हे इतर कुठल्याही माणसाच्या शरीराइतके मानवी होते. फरक एवढाच की तो कुमारी पासून जन्मलेला व पापविरहित असा होता. प्रेषित पौलाने नमूद केले आहे की **देवाने *शब्दासाठी* शरीर तयार केले** (इब्री १०:५) **मांसमय शरीर देव नव्हता. *पण* ते देवाचे शरीर होते- त्याचे निवास स्थान होते.**

देव शब्द बोलला. ***देवाच्या बोललेल्या शब्दाकरवी*** सर्व काही उत्पन्न झाले, किंवा अस्तित्वात आले. उत्पत्तीमध्ये आम्ही वाचतो की देव बोलला, *"प्रकाश होवो: आणि प्रकाश झाला"* वगैरे. बोललेला शब्द हा निर्मितीकारक होता (इब्री. ११:३). उत्त्पन्नकर्ता **शब्द** बोलल्याबरोबर सर्व काही सिध्द झाले, हजर झाले किंवा साकारले. त्याच न्यायाने किंवा अगदी त्याच पध्दतीने सर्वसमर्थ देवाने **पुं-बीजाची एक व स्त्री-बीजाची एक पेशी** निर्माण केली. त्यांना एकजीव करून त्याने तो गर्भ मरियेच्या कुशीत आरोपण केला. प्रारंभी कांहीही अस्तित्वांत येण्यापूर्वी देवाच्या ***मनांत*** अंकुरित झालेला (रूजलेला) ***शब्द (LOGOS)*** जो संपूर्ण जुन्या कराराच्या काळांत आविष्कारित झाला होता तोच **शब्द** नंतर कुमारिकेपासून जन्मलेल्या **मनुष्याने** वागवायचा किंवा वाहून न्यायचा होता. प्राचीनकाळच्या पवित्र पुरूषांना अंशाअंशांनी व प्रकारा प्रकारांनी जो प्रकट झाला होता तोच कालांतराने इस्त्राएलांना व जगाला अधिक स्पष्ट रीतीने न्याहाळता, चाचपता व हाताळता येईल अशा स्वरूपात मांसमय शरीराच्या मनुष्यात प्रकट करण्यात आला. तोच मनुष्य मानव जातीला देवाचे **पूर्ण प्रकटीकरण** होता. तो जिवंत देवाचे अपरिमित असे मंदिर होता. ***तात्कालिक व तात्पुरत्या स्वरूपांतील (Theophany) असा तो इम्मानुएल नव्हता तर जन्माच्या प्रक्रियेतून आलेला असा इम्मानुएल होता. पूर्वीचा तो (थिऑफनी) उत्पन्न केलेला नव्हता*** (हिब्रू: ***आदाम) पण नंतरचा मात्र उत्त्पन्न केलेला होता.*** यातील फरक आपणांस समजतो का? मानवी स्वभाव परिधान करण्यासाठी शब्द अवतरला. ***परंतु मनुष्याचा स्वभाव*** (हिब्रू: ***आदाम) हा देवाचा स्वभावगुण नाही.*** (निर्मिती निर्माता नाही) आणि **देव मनुष्य** नाही (गणना २३:१९ अ). मानवी स्वभाव हा निर्मितीचा गुणधर्म आहे (**मनुष्य**-हिब्रू-**आदाम**). तात्त्पुरत्या शरीरा द्वारे *इम्मानुएल* प्रकट झाला तेव्हा ते *तात्त्पुरते* शरीर (थिऑफनी), निर्माण केलेले नव्हते. परंतु देवाचा पुत्र येशू हा उत्पन्न केलेला होता, (मनुष्य-हिब्रू-आदाम) कारण कुमारी मरियेच्या उदरी पवित्र आत्म्याकडुन तो गर्भित झाला व जगात जन्मास आला.

(टीप:- येशू हा मरियेच्या स्त्री-बीजापासून जन्मला होता, अशा तऱ्हेचे शिक्षण कांही पंथ व संप्रदाय देतात. येशूने पृथ्वीवरील खराखुरा मनुष्य असण्यासाठी त्या बाबीचा गरज होती असे ते समर्थन करतात. येशू हा *देवाचा एकुलता एक पुत्र (MONOGENE)* होता हे सत्य आहे हे आपणा विश्वासणाऱ्यांस माहीत आहे. परंतु वरील प्रकारची सदोष शिक्षणप्रणाली ह्या सत्याला सुरूंग लावून त्याच्या जशा काय

ठिकऱ्या उडवते. कुमारी मरियेचे स्त्री-बीज शुध्द करून पवित्र आत्म्याकडून येणाऱ्या पुं-बीजाव्दारे गर्भसंभव व्हावा एवढ्याकरता तिच्यावर *छाया* करण्यांत आली नव्हती (लूक १:३५) तर पुरूषबालकाची उत्पती होण्यासाठी परात्पराची शक्ति तिच्यावर आली होती (मत्तय १:२०) त्या मुलाची माता म्हणून तिची निवड करण्यात आली होती. मानवजातीचे पुं-बीज व स्त्री-बीज ह्या दोहोतही *पतित स्वभावाचे आनुवंशिक दोष* असल्यामुळे आणि पतित मानवजातीची *नवी उत्पत्ती* ही फक्त *आत्मिक पुनर्जन्माद्वारे* शक्य आहे. म्हणून देवाने आपल्या पुत्राच्या जन्मासाठी मरियेचे एक स्त्री-बीज घ्यायचे, त्यातील *पारंपारिक* किंवा *अनुवंशिक दोष* काढून टाकायचे आणि मग गर्भसंभव होऊ द्यायचा, हा देवाच्या सनातन योजनेतील केवढा मोठा विरोधाभास. म्हणून नि:संशयपणे पुं-बीज आणि स्त्री-बीज ही दोन्ही पूर्णपणे देवाची उत्पत्ती होती. आणि त्याव्दारे देवाच्या सामर्थ्याने गर्भसंभव होऊन येशू ख्रिस्ताचा जन्म झाला.)

पवित्र आत्म्याने मरियेच्या कुशीत त्या गर्भाचे आरोपण केल्यावर क्रमाक्रमाने त्या गर्भाची वाढ होत जाऊन भ्रूण (*foetus*) व बाळ (*baby*) यामध्ये तो विकसित होत गेला. ***तो गर्भ कांही देव नव्हता; त्यातील भ्रूण देव नव्हता; तो बाळ देव नव्हता.*** पेशीपासून तर बाळापर्यंत सर्व वाढ नैसर्गिक रीतीने होत गेली. ह्या सर्व प्रक्रियेत इतर कुठल्याही मानवी बाळाला आपल्या आईच्या रक्तातून वारेद्वारे (Placenta) पौष्टिकांचा जसा पुरवठा केला जातो तसेच त्याच्याही बाबतीत घडले. पौष्टिक अन्न हे पृथ्वीचा उपज होते. शरीराच्या वाढीसाठी ते पुरवले गेले. **आणि देव हा कांही वस्तूजातापासून (निर्मित वस्तूंपासून) बनलेला नाही. देव आत्मा आहे.**

ते बाळ पवित्र लेकरू होते-त्याच्याविषयी लिहिलेले सर्व प्रकट करण्याकरता व त्याची परिपूर्ती करण्याकरता तो देवाचा पुत्र म्हणून जन्माला होता. येशू म्हणाला, *''तरी शास्त्रलेख परिपूर्ण होण्याचे अगत्य आहे''* (मार्क १४:४९) मेंढपाळांनी बाल तारणाऱ्याची भक्ति केली, आणि मागी लोकांनी त्या बाळराजाला वंदन केले. परंतु त्यावेळी बाळ म्हणून, बालक व मनुष्य या नात्याने येशू (हिब्रू—याशवा—देवाचे उध्दारक नाव) हा तारणारा व राजा फक्त *भावी अर्थाने* होता. काल्व्हरीच्या वधस्तंभावर त्याने आपला प्राण अर्पण केला *तेव्हांच* तो तारणारा म्हणून व्यक्त (सिध्द) झाला. आणि आपले एक हजार वर्षांचे राज्य स्थापित करण्यासाठी तो येईल *तेव्हांच* तो राजा असणार आहे. **देवाचा अवतार फक्त एकच होता** (आणि ती क्रीया येशूच्या पाण्यातील बाप्तिस्म्याच्या वेळी घडली). **पाण्याच्या बाप्तिस्म्याअगोदर ३० वर्षेपर्यंत त्याच्या आयुष्यात येशू हा देवाचा अवतार कधीच नव्हता. तोपर्यंत तो केवळ मनुष्य होता, देवाचा पुत्र होता,** पतन होण्यापूर्वी जसा आदाम हा मनुष्य आणि पापविरहित देवाचा पुत्र होता अगदी तसाच. (**येशूचा आत्मा** हा देवापासून असणारे **एकमेव आंतरबीज** (*Monogene*) आहे. परंतु **आदामाचा आत्मा** आणि **देवाच्या उध्दरलेल्या सर्व लेकरांचे आत्मे** हे देवापासूनचे आत्मे- बीज-वंश (*genes*) आहेत.) शिवाय तो प्रत्यक्षपणे अनंतकालिक देवापासून आल्यामुळे त्याच्यात पाप नव्हते आणि तो पूर्ण होता. त्याच्यामध्ये अनंतकालिक

जीवन होते. काल्व्हरीवर त्याने आपले जीवन अपूर्ण दिले नसते तर, तो आजहि जिवंतच असता आणि आता त्याचे वय सुमारे २००० वर्षांचे असते.

म्हणून त्याच्या आयुष्याची पहिली ३० वर्षे तो केवळ मनुष्यांमध्ये वावरणारा **मनुष्य** होता. तो वाढला; तो शिकला *''तो बालक वाढीस लागला आणि ज्ञानाने पूर्ण होत असता बलवान् झाला; त्याजवर देवाची कृपा होती (लूक २:४०) बाह्यतः त्याच्या बद्दल विशेष असे काहींच नव्हते.''...त्याला रूप नव्हते, त्याला शोभा नव्हती; त्याजकडे पाहिले तर त्याजवर मन बसेल. असे त्याच्या ठायी सौंदर्य नव्हते.''*(यशया ५३:२ब) *''येशू हा ज्ञानाने, शरिराने आणि देवाच्या व मनुष्याच्या कृपेत वाढत गेला.''* (लूक २:५२)

## दत्तकपणा

त्यानंतर त्याच्या **''दत्तकपणाचा''** दिवस आला (ग्रीक : हुईओथेसिया-याचा अर्थ **पुत्र म्हणून नियुक्ति किंवा प्रतिष्ठापणा करणे.** म्हणजेच जन्म झाला एवढ्याच अनुषांगिक नात्यावर अवलंबून न राहता, पुत्र म्हणून त्याचे निश्चित असे वेगळेपणाचे नाते **प्रस्थापित** करण्याचा प्रसंग. सामान्यपणे ही कृति उघडपणे किंवा जाहीरपणे केली जात असायची; तुलना-गलती ४:५). येशूच्या बाबतीत ही घटना त्याच्या बाप्तिस्म्याच्या वेळी व्हावी असा पूर्वसंकेत होता. त्यावळी तो साधारण ३० वर्षांचा होता. त्या दिवशी आकाश उघडले आणि **सर्वसमर्थ आत्मा** त्याच्यावर उतरला व त्याच्यामध्ये राहिला. **येशू ह्या मनुष्यांत देव अवतरला होता–इम्मानुएल! देहात आम्हाबरोबर देव.** (टिपः- लवकरच सैतानही ख्रिस्तविरोधी, पापपुरूष म्हटलेल्या एका मनुष्यात अवतरेल)

**येशू ख्रिस्त** हा ***''हातांनी न बनवलेला असा पूर्ण निवास मंडप.''*** होता असे प्रेषित पौलाने म्हटले आहे (इब्री ९:११) मोशाचा मंडप हा इस्त्राएल लोकांच्या हातांनी तयार केलेला होता. त्या *मंडपाची* सिध्दता व तयारी करण्यास त्यांना साधारण नऊ महिने लागले होते. (निर्गम २५--२९,३५-४० अध्याय). आणि मग ठरलेल्या दिवशी व समयी सर्व तयारी झाल्यावर निवासमंडप उभारण्यात आला तेव्हां *''दर्शनमंडपावर मेघाने छाया* केली व **निवास मंडप यहोवाच्या तेजाने भरून गेला.''** (निर्गम ४०:३४). अगदी ह्याचप्रमाणे नेमलेला दिवस व समयापर्यंत येशूची तयारी व सिध्दता (त्याच्या पाण्यातील बाप्तिस्मा-प्रसंगी) करण्यात आली होती. त्यावेळी आकाश उघडले गेले आणि **देवाचे गौरव वरून उतरले व त्याच्यामध्ये तें विराजमान झाले.** (मार्क १:९-११; योहान १:१४).

आता येशू हा जर दुसरा देव होता आणि अनंतकाळात तो पित्याबरोबर सहवास्तव्य करीत होता, तसेच तो देहधारी झाला व लहान बाळ असतानाच जर तो देव होता तर मग देवाने देवामध्ये वस्ती केली असाच निष्कर्ष काढावा लागेल. हे शास्त्राला धरून आहे का?

ज्याच्यामध्ये सर्वसमर्थ देव वास्तव्य करणार होता अशा मनुष्याची पूर्वछाया

म्हणजे मोशाचा निवास मंडप होता. ''**देव देहात (मनुष्यांत)** *वस्ती करून राहिला.''*

(त्रैक्यमतवाद्यांच्या गृहिता प्रमाणे) **येशूच्या त्या बाप्तिस्मा प्रसंगी बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने तीन व्यक्ती पाहिल्या नाहीत.** योहानाने देवाची वाणी ऐकली व अदृश्य आत्मा कबूतराच्या रुपाने आकाशातून उतरतांना व येशूवर राहतांना पाहिला. (पण तरी त्रैक्यमतवादी गृहीत धरतात की योहानाने ३ व्यक्ति पाहिल्या!) तेव्हांपासून पुढे येशू **अपरिमित अशा** पवित्र आत्म्याने परिपूर्ण असा होता. आणि देवाकडून त्याला **सर्व** कांही प्रदान करण्यात आले. (लूक ४:१; योहान ३:३४-३५). आणि मग **प्रभूचा ख्रिस्त** असल्याकारणाने सैतानाकडून त्याची कसोटी व्हायची होती. तेणेकडून अनंतकालिक पित्याचा **विचार** व **इच्छा** तो प्रकट करणार होता.

[टीप: लूक ४:१; योहान ३:३४-३५--येशू त्याच्या बाप्तिस्म्यापूर्वी पवित्र आत्म्याने परिपूर्ण होता ही बाब स्पष्ट होती. (तसेच देवाचे इतर संतजनहि होते) पण त्यावेळी तो देव अवतारी होता असा त्याचा अर्थ नव्हे, जसे कांहीं त्रैक्यमतवादी वाद घालणे शक्य आहे. त्याच्या बाप्तिस्म्यानंतर तो नेमका **कोण** व **काय** होता हे ह्या वचनांवरून ठामपणे सांगितले जाते. तो देवाच्या **आत्म्याने अपरिमित** असा भरलेला होता. तसेच देवाकडून त्याला **सर्व** कांही प्रदान करण्यात आले होते. बाप्तिस्मा करणारा योहान त्याचा जन्म होण्यापूर्वीच तो मातेच्या उदरापासून पवित्र आत्म्याने परिपूर्ण असावयाचा होता (लूक १:१५;) पण तो देव नव्हता. पेंटेकॉस्टनंतर पुष्कळ विश्वासणारेहि पवित्र आत्म्याने परिपूर्ण होते (प्रेषित ६:३,५;७:५५;११:२४) पण त्यामुळे ते देव नव्हते.]

त्याच्यामध्ये देवाचे सर्व स्वभावगुण परिपूर्ण अंशाने होते. त्याचप्रमाणे त्याच्याविषयी लिहिलेल्या सर्व गोष्टींची पूर्तता त्याला करायची होती. त्याच्या बाप्तिस्म्यापूर्वी त्याने कोणतेही चमत्कार केले नाहीत हे ध्यानात घ्या. ज्यांनी ज्यांनी खऱ्या अर्थाने ख्रिस्ताला पाहिले होते त्या सर्वांनी सार्वकालिक पित्याला पाहिले होते (योहान १४:९) कारण त्या शरीरात सार्वकालिक पिता राहत होता. (योहान १४:१०, यशया ९:६). **देहात प्रकट झालेला देव येशू होता** (१तिमथ्य ३:१६) **तो देवाचा व्यक्त किंवा प्रकट झालेला विचार (लोगॉस) होता. तो देव-मनुष्य म्हणजे ज्याच्यामध्ये खुद्द देव अवतरला आहे असा मनुष्य होता. तो आपला तारणारा झालेला आहे.** म्हणूनच नवीन हृदय प्राप्त करून घेण्यासाठी, नवीन आत्मा प्राप्त करून घेऊन उध्दार पावावा याकरता आपण त्याजवर विश्वास ठेवलाच पाहिजे (येहेज्केल ३६:२६-२७; प्रेषित १६:३१; स्तोत्र २:१२). **पिता-पुत्राचे** हे जे **नाते** प्रस्थापित झाले आहे तेणेकडूनच आम्हा नवा जन्म पावलेल्या विश्वासवाणाऱ्यांस खुद्द **देवाच्या पुत्राद्वारेच जिवंत देवाचीं कन्या-पुत्र** होणे शक्य झाले आहे. (तुलना स्तोत्र ८९:२६-२७; इफिस १:५; २करिंथ ६:१८).

ह्याच ठिकाणी **येशूचा जन्म, बालपण** व **प्रौढत्व** या संदर्भात काहीं शास्त्रवचने

ठराविक रीतीने कशी वापरली आहेत, याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितोः

| | |
|---|---|
| यशया ९:६- | *''आम्हासाठी बाल जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे...''* |
| लूक २:४०- | *''तो बालक वाढीस लागला आणि ज्ञानाने पूर्ण होत असता बलवान झाला.''* |
| लूक २:५२- | *''येशू हा ज्ञानाने, शरीराने आणि देवाच्या व मनुष्याच्या कृपेत वाढत गेला.''* |
| यशया ६१:१- | *''प्रभु यहोवा याचा आत्मा मजवर आला आहे, कारण दीनांस शुभवृत्त सांगण्यास यहोवानें मला अभिषेक केला आहे....त्याने मला पाठवले आहे.''* |
| योहान ३:१६- | *''देवाने जगावर एवढी प्रीति केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला...''* |
| योहान ३:१७- | *''देवाने पुत्राला जगाचा न्याय निवाडा करण्यासाठी नाही, तर त्याच्याद्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले.''* |
| योहान २०:२१- | *''....जसे पित्याने मला पाठवले तसे मीहि तुम्हांस पाठवतो.''* |
| मत्तय २१:३७- | *''....शेवटी त्याने आपल्या पुत्राला पाठवले....''* |
| योहान ३:३४-३५- | *''ज्याला देवाने पाठविले तो देवाची वचनें बोलतो; कारण तो आत्मा परिमित असा देत नाही. पिता पुत्रावर प्रीति करतो, आणि त्यानें सर्व त्याच्या हाती दिले आहे.''* |

लक्षात घ्याः **येशू पुत्र म्हणून जन्मला नव्हता. तो बालक म्हणून जन्मास आला व मूल म्हणून वाढला आणि शिकत असतांना तो ज्ञानाने वाढत गेला. पुत्र** म्हणून, देवाच्या परिपूर्ण स्वभावानिशी त्याला अभिषेक करण्यांत आला आणि देवाने सर्व कांही त्याच्या स्वाधीन केले. **जगाचा तारणारा व्हावा याकरता त्याला पुत्र म्हणून पाठवण्यांत व देण्यात आले.** यावरून एक गोष्ट फारच स्पष्ट दिसते की पुत्र म्हणून येशूचे **दत्तकपण** झाल्यानंतर त्याला प्रौढ किंवा पोक्त व्यक्ति म्हणून पाठवण्यात आले होते, (दत्तकपणाबद्दलचे स्पष्टीकरण मागे आलेच आहे.) लहान बाळ म्हणून त्याला पाठवण्यांत आले नव्हते.

## मनुष्य-गुण-दर्शक (PERSONIFICATION)

संपूर्ण पवित्र शास्त्रत ख्रिस्त हा जो **जिवंत शब्द** आहे त्याचे विविध प्रकारचे वर्णन उपमा-रूपकांद्वारे करण्यात आले आहे नीति ८:२२ मध्ये त्याला **ज्ञान** यहोवाच्या प्राचीन कृत्यातील पहिले कृत्य **(कुशल कारागिर)** म्हणून पैदा केले, असे म्हटले आहे. (पैदा केले, यालाच उत्पन्न केले, उभारले, अस्तित्वांत आणले असे प्रतिशब्द असून हिब्रू भाषेत त्याला *'कनाह'* असा शब्द आहे) ते (ज्ञान) त्याला (यहोवाला) नित्य आनंददायी होते. देवाचे **ज्ञान** हे **मन, शब्द** व **कृति** यामध्ये

त्याचे **सामर्थ्य** होते. पौलाने म्हटले आहे, "....***देवाचे सामर्थ्य*** *व* ***देवाचे ज्ञान असा ख्रिस्त*** *आहे.*" (१करिंथ १:२४). **देवाचा शब्द** आणि त्याचे **ज्ञान** हे बऱ्याच वेळा समानार्थी वापरण्यात आले आहेत. जीवन अस्तित्वांत आणण्यासाठी देवाच्या सर्वसमर्थ ह्या स्वभावगुणाचा आविष्कार झाला. त्यालाच **सूज्ञता** किंवा **सुज्ञान** म्हटले आहे. निर्मितीकारक घटक जो होता तोच देवाचा शब्द (लोगॉस) होता. मनुष्य रूपात असणारा आत्मा म्हणून तो बाहेर आला कारण नंतर जो मनुष्य निर्माण करायचा होता तो ह्याच आकाराच्या शरीरात म्हणजेच (सदृश प्रतिच्छायेसारखा) त्याच्या प्रतिमेत निर्माण करायचा असा देवाने हेतुपूर्वक संकल्प केला होता. (उत्पत्ति १:२६).

खाली कांही मोजके विशिष्ट शब्द प्रयोग दिले आहेत. त्यावरून **लिखित शब्द** हा **ख्रिस्ताचे रूपक** असल्याचे दर्शवले जाते.

| | |
|---|---|
| निति.३:१९- | *"प्रभूने पृथ्वीचा पाया* ***ज्ञानाने*** *घातला"* |
| योहान १:३- | *"**त्याच्याद्वारे** सर्व झाले; आणि झाले असे कांहींच **त्याच्यावाचून** झाले नाही."* |
| *निति.१०:२९-* | *"प्रभूचा* ***मार्ग*** सात्विकाला दुर्गरूप आहे." |
| योहान १४:६ | *"येशू म्हणाला,....मी* ***मार्ग*** आहे." |
| अनुवाद ८:३- | *"....मनुष्य केवळ* ***भाकरीने*** *नव्हे तर प्रभूच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने वाचेल."* |
| योहान ६:३३- | येशू म्हणाला, *"जी स्वर्गातून उतरते व जगाला जीवन देते ती देवाची* ***भाकर*** *होय."* |
| स्तोत्र ३४:२०- | *"त्याचें* ***हाड*** *न हाड तो सांभाळतो, त्यांतलें एकहि मोडत नाही."* |
| योहान १०:३५- | *"....**शास्त्रलेखाचा** भंग होत नाही."* |

अशाप्रकारे देवाची शास्त्रवचने ही **जिवंत ख्रिस्ताच्या** बाबतीत **लिखित आविष्कार** अशी आहेत.

# देवाचा शब्द

पवित्र-लेख *(Holy Writ)* ज्या इस्त्राएल लोकांना देण्यात आले होते ते शब्द आणि कृत्य या दोहोंत फरक करीत नसत (उदाहरणार्थ लूक ४:३२; मत्तय १२:३४; २ इतिहास २९:३०; नीति १०:१९-२१). **देवाचा शब्द हा बऱ्याचवेळा ऐकण्यापेक्षा पाहण्यात आला होता.** अशा प्रकारे जुन्या करारातील काळांत देवाने कांही विशिष्ट निवड पात्रांना आपले स्वतःचे प्रकटीकरण अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी वेळोवेळी केले. आम्ही निःसंशयपणे पाहू शकतो की सर्वसमर्थ देवाचा शब्द (हिब्रू-डाबार), त्याच्या सेवकांकडे आला किंवा त्यांना प्रकट झाला

(उत्पती १५:१; १५:४; १ शमुवेल ३:७; १ इतिहास १७:३; इत्यादी.) ह्या सर्व ठिकाणी वापरलेला तोच शब्द (ग्रीक : लोगॉस) योहान १ मध्ये उल्लेखलेला आहे.

देवाने आपल्या मनात स्वसंकल्प केला तेव्हां त्याने केवळ शब्दाकरवी बाहेर यावे असा त्याचा हेतु नव्हता तर तो व्यक्तीच्या रूपात प्रकट करावा असा होता. तो आत्मा असल्याकारणाने त्याने आपले व्यक्तिमत्व दृश्यरूप मनुष्याच्या आकारात (थिऑफनी) व्यक्त केले होते. ही जी सर्व तात्पुर्त्या व तात्कालिक स्वरूपातील मानवसदृश्य रूपे होती तीं केवळ पुढे येणाऱ्या *वास्तविक (खऱ्याखुऱ्या) बाबींची छायारूपे* होती. त्यांनी मशिहाची—*वचनदत्त बीजाची*—अगाऊ सूचना किंवा पूर्वसूचना दिली. (उत्पत्ती ३:१५;२२:१८, गलती ३:१६;२९;) त्याच्याविषयी जे सर्व बोलण्यांत किंवा लिहिण्यात आले होते ते सर्व तो पूर्ण करणार होता. म्हणून काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपला **शब्द** मानवी रूपात व्यक्त करण्यासाठी जगात पाठवला. तेथून पुढे आता तो तात्कालिक मानव सदृश्य (थिऑफनी) अशा पध्दतीने व्यक्त केला नाही तर खऱ्याखुऱ्या मांसमय मनुष्यात प्रकट केला. (लहान बाळ किंवा बालकात नव्हे, कारण *'थिऑफनी रूप'* हे पोक्त किंवा प्रौढ मानवरूप होते.) मनुष्य देवदूतांपेक्षा किंचित् कमी असा केला होता. कुमारी-स्त्री पात्राद्वारे जन्माच्या प्रक्रियेने. देवाने आपला विचार थिऑफनी-*मानव सदृश्य* रूपात जसा व्यक्त केला, त्याचप्रमाणे त्याने आपला विचार अगदी तशाच मानवी प्रतिरूपात व्यक्त केला (तुलना उत्पत्ती १:२६), तो मानव म्हणजे **मांसमय देह** होय. तो स्पर्शज्ञेय असा होता. जन्माच्या प्रक्रियेने तो व्यक्त झाला. तोच मनुष्य (योहान १९:५) *देवाचा परिपूर्ण व्यक्त झालेला विचार* होता. त्यालाच देवाचा शब्द असे म्हटले गेले होते. **ज्याच्यामध्ये देवत्वाची सर्व पूर्णता देहामध्ये वास करत होती असा येशू ख्रिस्त हा एकमेव मनुष्य होता.**

मानवाच्या निर्मितीत देवाने मनुष्याला आपल्या शब्दाद्वारे जीवन दिले. मानवाच्या उध्दारामध्ये देव त्याच शब्दाद्वारे त्याला अनंतकालिक जीवनासाठी नवी उत्पत्ती बनवतो. *''...देव ख्रिस्तामध्ये (देवाचा शब्द) आपणाबरोबर जगाचा समेट करीत होता,..''* (२ करिंथ ५:१९)

## व्यक्तित्व

पृथ्वीवरील त्याच्या अल्पकालीन वास्तव्याअगोदर सुमारे २००० वर्षांपूर्वी येशू ख्रिस्ताचे पूर्व अस्तित्व नव्हते, हे आपणासाठी पूर्णपणे स्पष्ट व्हावे. **कुठलीही बाब उत्पन्न करण्यापूर्वी खुद्द देवाचे व्यक्तित्व प्रकट करण्यासाठी देवाच्या मनातून बाहेर आलेले गुप्त रहस्य असा तो होता.**

देवत्वामध्ये (Godhead) एक व्यक्ति, दोन व्यक्ति की तीन व्यक्ति आहेत

## लोगॉस : देवाच्या सृष्टीचे आदिकारण

असे माणण्यापूर्वी, बहुसंख्य ख्रिस्ती लोकांना असे वाटते की देव ही व्यक्ति आहे. शास्त्रवचने ज्या पध्दतीने लिहिण्यात आली आहेत त्यामुळे आणि काही विशिष्ट शब्दप्रयोग (शब्द रचना)ज्या पध्दतीने वापरण्यात आले आहेत त्यावरून त्रैक्यमतवाद्यांनी असा चुकीचा निष्कर्ष काढला आहे की **देवत्वामध्ये एकाच तत्वाच्या** (Substance) **तीन भिन्न व्यक्ति** आहेत. अशा प्रकारे ते **तीन व्यक्तित तीन देव बनवतात.** उलटपक्षी देवाचे एकत्व माणणाऱ्या विश्वासणाऱ्यांनी कधी कधी *'दोन व्यक्तींच्या'* सिध्दांताची कास धरली आहे. त्यांच्या त्या सिध्दांतानुसार लोगॉस (शब्द) ही एक व्यक्ति आहे, किंवा येशू ख्रिस्त ही एक व्यक्ति आहे आणि *सर्वसमर्थ* देव ही आणखी एक व्यक्ति आहे.

यामुळे अधिक चांगल्या समजुतीसाठी आपल्याला **व्यक्ति** *(Person)* आणि **व्यक्तित्व** *(Personality)* ह्या दोन शब्दांचा अर्थ बारकाईने तपासून पाहणे भाग आहे. बहुतेक शब्दकोशात त्या दोन शब्दांचे अर्थ पुढीलप्रमाणे दिलेले आहेत:

**व्यक्ति** i) मानवप्राणी ii) व्यक्ति iii) एकाद्याची प्रत्यक्षातील आस्मिता, स्वत: iv) मानवप्राण्याचे शरीर, शारीरिक स्वरूप.

**व्यक्तित्व-** i) एकाद्याच्या मनाच्या गुणधर्माची किंवा स्वभावाची गोळाबेरीज ii) अस्तित्व, व्यक्तिमत्व, व्यक्तिगत ओळख.

सर्वसमर्थ आत्म्याला **व्यक्तित्व** आहे ही बाब निर्विवाद आहे. संपूर्ण पवित्र शास्त्रात तो त्याच्या व्यक्तित्वाचे विविध स्वभावगुण प्रकट करीत असल्याचे आपण पाहू शकतो. तरीपण, एकाद्या मानवी व्यक्तिसारखी **देव व्यक्ति नाही. देव आत्मा आहे.** योहान ४:२४ आणि इफिस ४:४ मध्ये हे स्पष्टपणे नमूद केले आहे.

एक उदाहरण घेऊ या. प्राणी हा कांही व्यक्ति नाही. हे आपल्याला ठाऊक आहे. तरीपण चिम्पँन्झी (एक मोठा वानर) सारख्या प्राण्याला एक विशिष्ट व्यक्तित्व किंवा व्यक्ति विशेष असतो. (त्यालाच त्याच्या मनांतील व स्वभावातील गुणांची गोळाबेरीज म्हणता येईल)

**देवाच्या अत्म्याचे व्यक्तित्व** किंवा **व्यक्तिविशेष हा व्यक्तिमध्ये प्रकट होतो- ती व्यक्ति म्हणजे येशू ख्रिस्त** इब्री १:३ मध्ये म्हटले आहे की येशू ख्रिस्त हा *''... त्याच्या तत्वाचे प्रतिरूप होता''* काही भाषांतरांत *'तत्व'* ऐवजी *'व्यक्ती'* असा शब्द प्रयोग आहे ते चुकीचे भाषांतर आहे. ग्रीकमध्ये त्या साठी *'हुपोस्टासिस'* असा शब्द असून त्याचा अर्थ तत्व *(Substance)* आहे. म्हणून **येशू ख्रिस्त हा देवाच्या तत्वाचे किंवा स्वभावाचे तंतोतंत प्रतिरूप होता.** हेच साध्या भाषेत असे म्हणता येईल की **आमचा तारणारा** हा देव जो व्यक्ति म्हणजे देवाचे खास व्यक्तित्व आहे जे त्याच्यामध्ये प्रकट व उघड झाले आहे.

# दुहेरी स्वभाव (DUAL NATURE)

येशू ख्रिस्ताबद्दलची समजण्यास कदाचित सर्वात कठीण गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे त्याच्या **व्यक्तित्वाची** घडण होय. तरीपण, आपल्याला हे निश्चित समजते की ज्यावेळी तो *मनुष्य* म्हणून ह्या पृथ्वीवर होता त्यावेळी तो देव हे जे मूळचे ठाम व निस्सीम अस्तित्व त्यापासून वेगळी व भिन्न व्यक्ति होता. परंतु हे ध्यानांत घ्या, त्याच्या बाप्तिस्म्या अगोदर तो फक्त निष्पाप मनुष्य होता, जो प्रत्यक्षांत वरुन आलेला (योहान ८:२३) असा होता; मरिया योसेफाच्या संबंधातून आलेला नव्हता. त्याच्यामध्ये अनंतकालिक जीवन असण्याचे कारण म्हणजे त्याच्यामध्ये पापाचा लवलेशही नव्हता. म्हणून स्वभावतः तो मरु शकत नव्हता. त्याने मुभा किंवा परवानगी दिली तरच शारीरिक दबावाने त्याच्यावर मृत्यू येऊ शकत होता. (लूक २३:४६, १ करिंथ.१५:३) त्याला खाण्याची गरज होती तशी झोपण्याचीही होती. (मत्तय ४:२; ८:२४). तो थकला भागला जाऊ शकत होता व त्याला वेदना होऊ शकत होत्या (योहान ४:६; लूक २२:४४). परंतु **देव** जो **आत्मा** आहे तो ह्या सर्व दडपणांच्या अधीन नाही.

म्हणून, बाप्तिस्म्याच्या वेळी येशू **देव-अवतारी** होण्यापूर्वी **मनुष्य** होता, **देव** नव्हता. आदामाच्या पतनापूर्वी तो जसा मनुष्य आणि त्याचबरोबर देवाचा एक पुत्र असून पापविरहित होता व त्याच्यात सार्वकालिक जीवन होते. तसाच येशू त्याच्या बाप्तिस्म्यापूर्वी केवळ मनुष्य व देवाचा पुत्र होता. परंतु **देवाचा एकमेव पुत्र** असणे ह्या बाबतीत फक्त येशूलाच सर्वश्रेष्ठत्व होते.

त्याच्या बाप्तिस्म्यानंतर देवाची सर्व **परिपूर्णता त्याच्यामध्ये** वास करुन राहिली. तेव्हापासून येशू हा **देव-मनुष्य** (***GOD-MAN,*** both **God** and **Man.**) झाला. तेथून पुढे त्याच्या शब्दांत सामर्थ्य होते. त्यापूर्वी त्याच्या शब्दांत सामर्थ्य नव्हते. **सर्वसमर्थ देव** त्या देव-मनुष्याच्या ओठाद्वारे त्याचे जीवनाचे व सामर्थ्याचे शब्द बोलू लागला. उलटपक्षी येशूला त्याच्या मित्रांनी अन्न दिले, मुक्कामाची तरतूद केली त्याबद्दल त्याने त्याच ओठातून कदाचित आभाराचेही शब्द उच्चारले. आणि त्याच ओठाद्वारे त्याने देव जो त्याचा पिता त्याच्या स्तुतीपर शब्द वापरले.

गलती ४:४ मध्ये *''...देवाने आपल्या पुत्राला पाठवले. तो स्त्रीपासून जन्मलेला..''* असे जे पौलाने म्हटले आहे त्यावेळी तो निर्विवादपणे ख्रिस्ताच्या देहाचा किंवा मानव्याचा उल्लेख करीत होता. तसेच **सार्वकालिक पिता** किंवा **देव** असा जेव्हा उल्लेख करण्यात आला तेव्हा तो उल्लेख सर्वसमर्थ आत्म्याबद्दल होता. तो आत्मा आपल्या पुत्रात वास करीत होता. अशाप्रकारे १ तिमथ्य ३:१६ मधील महान रहस्याचा उलगडा झाला. **''देव देहात प्रकट झाला...''**

*(टीप : जुन्या कराराच्या काळातील निवडलेले लोक देवाला ''स्वर्गीय पिता'' असे कधीच संबोधित नव्हते. तसेच त्यांनी वळून ''स्वर्गीय पुत्रा'' अशी हाक मारल्याचा वृत्तांतही कोठेच नाही.)* कारण ''आनंतकालिक पुत्र'' असा काही प्रकार

नाही. ''सार्वकालिक पिता'' व ''स्वर्गीय पिता'' ह्या नव्या करारातील संज्ञा आहेत. यातील ''सार्वकालिक पिता'' ही संज्ञा जरी जुन्या करारात एकदाच वापरल्याचे आढळत असले (यशया ९:६) तरी तो उपयोग भविष्यसूचक अर्थाने केला आहे. नव्या करारात सार्वकालिक देव स्वतःचे प्रकटीकरण पुत्राच्या देहात करणार होता. ह्या भविष्यरुप (भावी) अर्थाने तो उपयोग केला आहे. देवाचा एकुलता एक पुत्र जो देवाच्या कुटुंबाचा समेट करण्यासाठी जन्मला त्याच्यामुळे वरील दोन्ही संज्ञा नव्या करारात वापरल्या आहेत (इब्री. १:५-१४, तुलना २ शमुवेल ७:१४; स्तोत्र २:७; प्रेषित १३:३३; रोम १:४ तसेच दानिएल ७:९-१०; १३-१४; प्रकटी १:१३; मत्तय २५:३१; इफिस १:२०-२२. मीखा ५:२; मध्ये देव इस्राएलमधून जो शास्ता आणणार होता त्यासंबंधीच्या भविष्यवाणीमध्ये *''त्याचा उद्भव प्राचीन काळापासून, अनादि काळापासून आहे...''* असा जो वाक्यांश आलेला आहे, तो भविष्यवाणीचा एक भाग आहे. ह्या भविष्यवाणीची पूर्तता करणारा येशू हा अनंतकाळापासून अस्तित्वात होता असे त्यावरुन सूचित केले जात नाही. तर त्याऐवजी अति प्राचीन काळातील युगापासून त्याचा उद्भव आहे असा गर्भितार्थ त्यामध्ये सामावतो. तरी त्यावेळी सुद्धा येशू हा देवापेक्षा वेगळी व्यक्ति म्हणून अस्तित्वात नव्हता. परंतु तो देवाचा पूर्ण शब्द असल्याकारणाने आणि तो अवतारधारी होऊन प्रकट केला गेल्यामुळे शास्त्रवचनांनी त्याची सुरुवात **एलोहिम** मध्ये कशी होती याचा मागोवा घेतला आहे किंवा छडा लावला आहे. याचाच अर्थ तो सर्वसमर्थ आत्म्याच्या मनात किंवा उराशी अग्रक्रमाने व प्राधान्याने होता. देवाच्या संकल्पयुक्त अनंतकालिक मनातून जो जो **लोगॉस** त्याला प्रकट होण्यासाठी व त्याचा पूर्वनमुना व्यक्त करण्यासाठी बाहेर आला तो **एकुलता एक पुत्र** होता. पुढील वेगवेगळी भाषांतरे ह्या बाबीवर अधिक प्रकाश टाकतील.

> *''त्याचा मूळारंभ दूरच्या भूतकाळापर्यंत प्राचीन काळच्या दिवसापर्यंत मागे जातो.''* *(द् जेरुसलेम बायबलच्या भाषांतराचा तरजुमा)*
>
> *''त्याची मूळ सुरुवात ही प्राचीन युगापासून आहे, अनंतकालाच्या युगांपासून आहे.''* *(द् सेक्रेड स्क्रिपचर्स बेथेल आवृत्ति)*
>
> *''त्याच्या हकिकती किंवा वृत्तांत प्राचीन काळापासून अनंतकाळापासून वर्तविण्यात आलेल्या आहेत.''* *(लॅम्सा ट्रान्सलेशन)*
>
> *''त्याची निघणी पुरातन कालापासून प्राचीन दिवसांपासून आहेत.''*
> *(रमाबाईंचे भाषांतर)*

**गेथसेमेनी बागेत येशू प्रार्थना करीत असतांना देव देवाची प्रार्थना करीत नव्हता.** ज्याची भक्ति केली जाते व ज्याला प्रार्थना सादर केल्या जातात असा एकच देव आहे. देव भक्ति किंवा प्रार्थना करीत नाही. तो तसे करतो तर तो स्वतःच आपल्या देवत्वाला वंचित किंवा पारखा होतो. किंवा तो स्वतःच आपले देवत्व अमान्य करतो, असे म्हणावे लागेल. येशू हा मनुष्य देव जो त्याचा पिता याची प्रार्थना करीत होता. पुनरूत्थानानंतर मरिया मग्दालियेला दर्शन देतेवेळीचे त्याचे हे शब्द आहेत : ''येशूने तिला म्हटले, मला शिवू नको; कारण मी अद्यापि

माझ्या **पित्याजवळ** वर गेलो नाही; तर माझ्या भावांच्याकडे जाऊन त्यांस सांग, जो **माझा पिता** व **तुमचा पिता** आणि **माझा देव** आणि **तुमचा देव** त्याच्याकडे मी वर जातो.'' (योहान २०:१७).

**तसेच आमच्या पांपासाठी काल्व्हरीवर मेला तो देव नव्हता. कारण देव मरू शकत नाही. देव आत्मा आहे. ख्रिस्त येशू जो देवाचा एकुलता एक पुत्र तो आमच्यासाठी मरण पावला** (१ करिंथ १५:३). मला म्हणायचेच झाले तर मी असे म्हणू शकेन : 'तरीपण कसेहि करून एका अर्थाने देव नक्कीच मरण पावला.' आपली कराराची उद्धार-योजना कार्यवाहीत आणण्यासाठी **अनंत कालिक आत्म्याला** एकाच वेळी **देव** आणि **मनुष्य** या दोन्ही भूमिकेत असण्याचे अगत्य होते. करार अमलात किंवा कायदेशीर रीत्या कार्यवाहीत आणण्यासाठी करार करणाऱ्याला मरणे भाग होते. हा कराराचा नियम होता. (इब्री. ८:७-१३;९:१६-१७). आणि **देव आत्मा** असल्याकारणाने मानव जातीशी त्याची स्वतःची एकरूपता दर्शवण्यासाठी आणि आमच्याकरता मरणाचा अनुभव घेऊन आमचा उद्धार करण्यासाठी त्याला मनुष्याचे रूप घ्यावेच लागले. (इब्री. २:९, रोम. ८:३) म्हणून (ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन) काल्व्हरीवर जो मरण पावला तो परिपूर्ण अर्थाने करार करणारा यहोवा होता.

# देव नाही, पण शब्द वधस्तंभी खिळला गेला

दुसऱ्या दृष्टीकोनांतून आम्हाला हेहि समजते की **शब्द जो देव** होता तो वधस्तंभावर खिळला गेला. जग होण्यापूर्वी आरंभी जो शब्द गौरविला गेला (योहान १७:५) तो काल्व्हरीवर वधस्तंभी दिला गेला. येशू, **देवाचा शब्द** मरण पावला आणि त्याचे पुनरूत्थान व स्वर्गारोहण झाल्यानंतर पवित्र आत्मा देण्यात आला तो पुन्हा एकदा वचन (शब्द) दृढ करण्याकरता व अनंतकालिक आत्म्याकडून पुन्हा गौरविला जाण्याकरता. म्हणजेच त्याने केलेल्या प्रार्थनेबरहुकूम घडण्याकरता तसे झाले. (योहान १२:२८; तुलना ७:३९; १ तिमथ्य ३:१६).

**'एलोहिम'** स्वतःची ओळख नेहमीच **शब्दाशी** पटवतो. हे आपण समजून घेणे गरजेचे आहे. कारण ते **एक** आहेत (योहान १:१; १ योहान ५:७). येशू वधस्तंभावर मरत असतांना एकाएकी आरोळी मारून म्हणाला, "माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?'' (मत्तय २७:४६). त्याची ही आरोळी तीव्र वेदनेची व क्लेशाची होती. कारण ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याच्यावर एकाएकी मानवजातीच्या पापाचा बोजा लादण्यात आला. त्याच्याबद्दल केलेल्या जुन्या करारातील अनेक भविष्यवाण्यांची परिपूर्ती करीत असतांना तो **पाप-वाहक** झाला. पापाच्या भाराखाली देवाने आपला त्याग केला आहे असे त्याला वाटले, कारण तो मानवी देहात होता. आणि त्याने जगाचे पाप आपल्यावर घेतल्याकारणाने न्यायाचा निवाडा त्याच्यावर लागू करण्यांत आला. आणि म्हणूनच त्याने ती हृदयविदारक आरोळी ठोकली. परंतु प्रत्यक्षात देवाने त्याला एकटे सोडले नव्हते व त्याचा मुळीच

त्याग केला नव्हता (योहान १६:३२)

(टीप : लेवीयच्या पुस्तकांतील ''अन्नार्पणा''चा (लेवीय २:१-३) अभ्यास पुढील गोष्टी स्पष्ट करतो : यातील ''सपीठ'' हे **ख्रिस्ताची मानवता** दर्शवते. ''धूप'' **ख्रिस्ताचे मध्यस्थीचे जीवन** दर्शवते. ही दोन्ही ''तेलांत'' मिसळणे म्हणजे **देवाच्या पवित्र आत्म्यांत** एकत्रित करणे होय. हे सर्व एकत्रितपणे वेदीवर अग्नीने भाजण्यात येत असे. **अग्नि हे काल्व्हरीचे** दर्शक आहे. त्यावरून हे सिद्ध होते की देवाने येशूला काल्व्हरीवर प्रत्यक्षात एकटे असे कधीच सोडले नव्हते)

# येशू ख्रिस्ताचे पूर्ण-वेष्टित देवत्व– देव ख्रिस्तामध्ये

येशूने *तीन गोष्टींची* पूर्णता करावी असा त्याच्यासाठी देवाचा हेतु होता. योहानाच्या १७व्या अध्यायांत हे विदित करण्यात आले आहे. त्या तीन गोष्टी अशा :

१) देवाने त्याला दिलेले **काम** समाप्त करणे (वचन ४)

२) देवाचे **नाम** प्रकट करणे (वचन ६)

३) देवाची **वचने** देणे (वचन ८)

देवाने त्याला प्रदान केलेल्या *अधिकाराने* त्याने हे सर्व पूर्ण केले. योहान १४:१० मध्ये तो म्हणाला, *''मी पित्यामध्ये व पिता मजमध्ये आहे असा विश्वास तू धरीत नाहीस काय? ज्या गोष्टी मी तुम्हांस सांगतो त्या मी आपल्या मनच्या सांगत नाही, तर मजमध्ये राहणारा पिता स्वतःची कार्ये करतो.''* 'येशू हा त्याचा स्वतःचा पिता आहे' असा विश्वास *''फक्त येशूच''* (*Jesus only*) ह्या चळवळीचे अनुयायी धरतात. परंतु **येशू हा स्वतःचा पिता *नाही*,** हे त्या लोकांना सिद्ध करून दाखवण्यासाठी योहान १४:१० हे वचन पुरेसा भक्कम पुरावा ठरते.

आपल्या मानवी हयातीत येशू स्वतःच्या इच्छेप्रमाणे करण्याचा प्रयत्न करू शकला असता. परंतु त्याच्या जीवनांत त्याने केवळ देवाच्या परिपूर्ण इच्छेप्रमाणे करण्याचीच अपेक्षा ठेवली. *''तो पुत्र असताहि त्याने जे दुःख सोशिले तेणेकडून तो आज्ञांकितपणा शिकला''* (इब्री. ५:८). होय, त्याने मरण, आणि तेहि वधस्तंभावरचे मरण पत्करले. (फिलिप्पै. २:८; स्तोत्र १२९:३; यशया ५३:२-५,११; मार्क १५:१९-२८; १ पेत्र १:९-११). त्याचे मन, शब्द आणि कृति ही देवाच्या इतकी अधीन होती की तेणेकडून तो आणि देव अक्षरशः **एक** झाले होते. *''मी आणि माझा पिता एक आहो.''* (योहान १०:३०,३९). त्याचा आत्मा देवाच्या आत्म्याशी इतक्या सुरेल व सुरेख रीतीने एकरूप झाला होता की त्याचा आत्मा **अनंतकालिक आत्म्याशी एक झाला** होता. देवाचे संतजनहो, आपणहि त्याच्या वचनाच्या पूर्णपणे अधीन होऊन आपल्या आत्म्यांचा मिलाफ देवाच्या आत्म्याशी अशा रीतीने करावा की तेणेकडून जगाला आपल्या ठायी फक्त ख्रिस्तच दिसेल. येशूने म्हटल्याप्रमाणेच

हे व्हावे, *''त्या दिवशी तुम्हास समजेल की मी आपल्या पित्यामध्ये, तुम्ही मजमध्यें व मी तुम्हामध्ये आहे.''* (योहान १४:२०). तसेच त्याच्या प्रार्थनेनुसार आपण त्याची इच्छा पूर्ण करण्यास झटू या. *''... यासाठी की त्या सर्वांनी एक व्हावे; हे पित्या, जसा तू मजमध्यें व मी तुजमध्यें तसे त्यांनीहि आम्हांमध्यें व्हावें यासाठी की तू मला पाठवले असा विश्वास जगाने धरावा''* (योहान १७:२१,२२,२३)

**देव त्याच्याठायी वास करीत असल्यामुळे खुद्द ख्रिस्ताचीहि देवासारखी भक्ति केली जात होती**, कारण **येशू ह्या मनुष्यात देव अवतरला होता. परंतु येशूने त्याचे व (आपले) लक्ष नेहमीच सार्वकालीक पिता, जो जीवनाचा आत्मा याच्याकडे वेधले.** *''कारण एकच देव आहे, आणि देव व मनुष्ये यामधील ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे.''* (१ तिमथ्य. २:५). *''मध्यस्थ हा एकाचा नसतो, आणि देव तर एक आहे.''* (गलती ३:२०)

येशूसंबंधाने पौलाने म्हटले आहे, *''... देहसंबंधाने ख्रिस्त आहे, तो सर्वांवर आहे; युगानुयुग धन्यवादित देव.''* (रोम ९:५) **येशू हा प्रभु व ख्रिस्त होता.** (प्रेषित २:३६) म्हणून निःसंशयपणे, **प्रभु येशू ख्रिस्त हा एकाच वेळी देव व मनुष्य होता** आणि **देव** व **ख्रिस्त** हे **एक** आहेत. *''त्रिव्यक्तीमध्ये देव, धन्य त्रैक्य''*, असा कांही प्रकार नसून *''एकाच व्यक्तीमध्ये देव, धन्य ते ऐक्य.''* अशी वस्तुस्थिती आहे. म्हणूनच **येशू ख्रिस्ताच्या नावातील पाण्याच्या बाप्तिस्म्याबद्दलचे प्रेषितीय प्रकटीकरण हे सत्य आहे,** हे आम्हास समजते. (प्रेषित २:३८;८:१२,१६;१०:४८;१९:५; तुलना - मत्तय २८:१९-त्रिविध शीर्षकांचे एकच नाव)

# कैवारी

ख्रिस्तमध्ये जो वास करीत होता **तो पवित्र आत्मा** पित्याचा *आत्मा* आहे. आणि ख्रिस्त व देव *एक* असल्याकारणाने, त्यालाच *येशू ख्रिस्ताचा* आत्मा, (फिलिप्पै. १:१९) तसेच त्याच्या *पुत्राचा आत्मा* (गलती ४:६) असेहि म्हटले आहे.

प्रेषित योहानाने येशूच्या ह्या शब्दांची नोंद केली आहे : *''जीवंत करणारा तो आत्माच आहे, देहापासून कांही लाभ होत नाही; मी जी वचने तुम्हांस सांगितली आहेत ती आत्मा व जीवन आहेत''* (योहान ६:३३) त्याच प्रेषित योहानाने नंतर त्याच पुस्तकांत असे लिहिले, ''...त्याने त्याजवर फुंकर टाकिला, आणि त्यास म्हटले, पवित्र आत्मा घ्या.'' (योहान २०:२२). आपण मनुष्याचे व्यक्तित्व आणि त्याचा फुंकर यामध्ये फरक करू शकत नाही. हेच ह्या विधानांवरून प्रस्थापित होते. आपल्याला जर ह्या दोहोमध्ये फरक करता येणे शक्य असेल तरच येशू ही व्यक्ति व पवित्र आत्मा यातील फरक सिद्ध करण्यात आपल्याला यश येऊ शकेल.

**ख्रिस्त** (शब्द) हा **पित्यापासून** (अनंतकालिक आत्मा) आला आणि त्याच्या प्रायश्चित्ताच्या कार्यानंतर त्याला पुनः पित्याकडे जाणे अगत्य होते (योहान १६:२८) परंतु त्याने वचन दिले, *''मी तुम्हांस अनाथ असे (ग्रीक-ऑर्फनॉस*

*आईवडिलांविना, पित्याशिवाय) सोडणार नाही, तर मी तुम्हांकडे परत येईन.''* त्याच्या स्वर्गारोहणानंतर दहा दिवसांनी तो पुनः त्याच महान जीवनाच्या झऱ्यातून निघाला. कशासाठी? त्याच्या मंडळीबरोबर राहण्यासाठी आणि मंडळीतील प्रत्येक घटकांत त्यांचा पिता म्हणून राहण्यासाठी. (गलती ४:६, प्रकटी २१:७) व्यक्ति म्हणून ह्या पृथ्वीवर असेपर्यंत तो हे करू शकत नव्हता. परंतु आता आत्म्याच्या रूपांत तो हे करू शकतो. (योहान १४:१६-२०). अशा प्रकारे येशू ख्रिस्त ही व्यक्ति देवाच्या पवित्र आत्म्याच्या रूपाने त्याच्या वचन-विश्वासू संतजनामध्ये राहते. किंवा निवास करीत आहे. पवित्र आत्मा आपल्यामध्ये वास करतो हे प्रेषित पौलाच्या पुढील शब्दांवरून स्पष्टपणे दर्शवले जाते. *''... गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुम्हामध्ये आहे...''* (कलस्सै. १:२७, रोम ८:९-११). होय, ख्रिस्ताच्या दारिद्र्याद्वारे आम्ही धनवान झालो आहोत : *''आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हाला माहीत आहे; तो धनवान असता तुम्हाकरता दरिद्री झाला, यासाठी की त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान् व्हावे.''* (२ करिंथ ८:९, इफिस २:१३-१६).

म्हणून देवाच्या संतांच्या ठायी **दोन** किंवा **तीन दैवी व्यक्ति** वास करीत नाहीत. नव्या करारातील सर्व अनेकवचनी सर्वनामेदर्शक शब्द उदा. योहान १४:२३ मधील *''आम्ही''* आणि *''आमचे''* हे देव **सर्वसमर्थ याव्हे** म्हणून कोण आहे तसेच तो **याशवा** म्हटलेला **मनुष्य** म्हणून कोण आहे, यातील फरक दर्शवतात. योहान १२:४५ मध्ये **एका व्यक्तीच्या** दोन भूमिका कशा रीतीने कार्यवाहीत होत्या हे आम्ही पाहू शकतो. *''जो **मला** पाहतो तो, ज्याने मला पाठवले **त्याला** पाहतो.''* ख्रिस्त येशूमधील **दुहेरी स्वभाव** ध्यानात घ्या. **पित्याचा आत्मा जो सर्वसमर्थ, सर्वज्ञ, व सर्वत्र आणि पुत्राचा आत्मा जो नम्रता, आज्ञाधारकपणा, याजकपणा, प्रार्थनामय वृत्ति आणि अधीनता आहे, ह्या दोन्हींचे स्वभावगुण केवळ एकच आत्मा आहे.** (इफिस. ४:४)

# अलफा व ओमेगा

**येशू हा देवाचा अनंतकालिक पुत्र कधीच नव्हता. तर तो देवाचा एकुलता पुत्र आहे.** म्हणून **पुत्रत्व** ह्या **सेवेची** जशी **सुरवात** आहे, तसाच त्या सेवेचा **शेवटहि** होईल. राजांचा राजा म्हणून त्याचे एक हजार वर्षांचे राज्य संपल्यानंतर येशू ख्रिस्त अखेरचा न्याय जाहीर करण्यासाठी आणि पृथ्वीला पाप व मरणाच्या सर्व मागमूसापासून शुद्ध करण्यासाठी महान शुभ्र न्यायासनावर बसेल. त्यानंतर तो हे उद्धरलेले राज्य पुनः पित्याच्या स्वाधीन करील यासाठी की जसे प्रारंभी होते तसे पित्याने सर्वांमध्ये सर्व व्हावे. (१ करिंथ. १५:२४-२८) तेथूनपुढे येशू हा देवाच्या लेकरांचे जे कुटुंब (परिवार) त्याच्या अग्रभागी, पुष्कळजणांत प्रथम जन्मलेला असा त्यांचा ज्येष्ठ बंधु म्हणून विराजमान होईल.

प्रकटी १:८ मध्ये प्रभु देव *''जो आहे, होता व येणार तो सर्वसत्ताधारी''*

(अनादि, उच्च आणि थोर आत्मा) म्हणतो, *''मी अल्फा व ओमेगा, प्रारंभ व शेवट आहे.''* जो अनादि-अनंतकालिक आहे त्याचा आपल्या उत्पत्तीच्या योजनेशी कसा संबंध आहे याबद्दल, तसेच आपल्या मनाच्या स्वसंकल्पानुसार व आपल्याच इच्छेनुसार ज्याने प्रारंभी ही महान उद्धार-योजना आखली तिचा परिपूर्ण व गोड शेवट तो कसा करणार त्याबद्दलचे हे वचन आहे. आणि मग जेव्हा काळ ***(TIME)*** ''प्रारंभ व शेवट'' देवामध्ये (अनंतकालिक आत्म्यामध्ये) **सार्वकालिक वर्तुळांत** शोषून घेतला जाईल किंवा विलीन केला जाईल तेव्हां फक्त **अनंतकाळच** (Eternity) असेल.







फ्रान्समधील टेग्नॉनमध्ये (कॅथॉलिक चर्चमध्ये) दिसणारे त्रैक्य चिन्ह

## अविनाशी बीजापासून (शब्दापासून) होणारा अध्यात्मिक जन्म (नवा जन्म)

**अनंतकालीक आत्म्याच्या मनात एकमेव अंतर्गत बीज व दुसरी बीजे. -एकमेव बीज इतर बीजांना उत्पन्न करते.**

(प्रथम व एकुलता पुत्र ज्याच्याद्वारे इतर पुत्र उत्पन्न होतात.)


फक्त अध्यात्मिक बीजे (पूर्व निवडीची) अध्यात्मिक शब्दाचे (लोगॉस) भाग आहेत.




*२ अविनाशी बीज-शब्द त्याचा आत्मा जिवंत करण्यासाठी येतो. - नवा जन्म

***१ शब्दा हा** देवाच्या पूर्वनिवडीच्या बीज पुत्राला निर्माण करतो. जो स्वर्गीय शरीर टाकून निसर्ग नियमाच्या मार्गाने जगात येतो.

**खरी अध्यात्मिक बीजे ही पुनर्जन्माद्वारे येतात- हीच नवी उत्पत्ती !**



**नैसर्गिक**

**अध्यात्मिक (आत्मिक)**

***३ आणि माग आत्मिक मनुष्य त्या दिवसाची वाट पाहत राहतो. ज्या दिवशी तो आपले स्वर्गीय शरीर (थिऑफनी रुप) धारण करील (१ करिंथ १५:४०-४९;२ करिंथ ५:१-९) हे रुपांतराच्या वेळी किंवा मृत्यूसमयी घडेल. मग तो पुन्हा पृथ्वीवर पुनरुत्पत्तीच्या युगांत येईल. देवाचा दत्तक पत्र या नात्याने.**

# * पुरवणी *

## त्रैक्याचा सिद्धांत

*त्रैक्याचा* सिद्धांत (१ देवात ३ देव) हा त्याच्या अति उत्साही शिक्षकांनी मानलेला सिद्धांत आहे. हा सिद्धांत म्हणजे *''स्पष्टीकरणाच्या व कल्पनाबुद्धीच्या पलीकडे असणारे एक रहस्य, गूढ किंवा गूज''* आहे, असे त्याचे वर्णन केले जाते. वास्तविक पाहता तो एक *सावळागोंधळ* (CONFUSION) किंवा *गडबडघोटाळा* आहे!

''दोन बाबिलोन'' *(The Two Babylons)* ह्या आपल्या पुस्तकात अलेक्झांडर हिस्लॉपने रोमन पूजा-भक्ति *(Roman cult)* पद्धतीचा मागोवा घेतांना तिचे रीतीरीवाज व शिकवण ही अति प्राचीनकाळच्या मूर्तिपूजक धर्मपद्धतीपर्यंत मागे जाते हे विषद केले आहे. हे करीत असतांना **पोपच्या पूजेचे** मूळ निम्रोद व त्याची पत्नी यांच्यात असल्याचे हिस्लॉप सिद्ध करतो. (पाहा उत्पत्ति १०:८-१२).

रोमन कॅथॉलिक धर्मपद्धतीची (यामध्ये आपण प्रॉटेस्टंट प्रणालीचाहि समावेश केला तरी चालेल, कारण ती कॅथॉलिक पद्धतीपासून फारशी वेगळी झालेली नाही) तुलना प्राचीन बाबिलोनच्या मूर्तिपूजक धर्माशी करतांना हिस्लॉपने हाताळलेला पहिलाच विषय कोणता असेल तर तो *''ऐक्यांत त्रैक्य''* *(Trinity in Unity)* हा होय. वेगवेगळ्या अधिकृत संदर्भ ग्रंथातील पुरावे उध्दृत (सादर) करतांना असे दिसते की त्रैक्याची कल्पना ही प्राचीन आहे : *''बाबिलोनी लोकांच्या त्या एकाच देवात तीन व्यक्ति समाविष्ट होत्या आणि... ते चित्रित करतांना त्यांनी समभूज त्रिकोणाचा उपयोग केला आहे. अगदी तीच गोष्ट आज रोमन कॅथॉलिक चर्च करीत आहे, हे सुप्रसिद्धच आहे.''* (पान १६) ''पोपच्या अधिकार क्क्षेतील एका मठात माद्रिदच्या *(Madrid)* तथाकथित त्रैक्यावाद्यांची 'त्रेक देव' अशी प्रतिमा किंवा मूर्ति आहे. एकाच शरीर-धडावर तीन डोकी'' अशा तऱ्हेची ती मूर्ति आहे. (पान १७) अशाच प्रकारचे समानत्व दर्शवणारे, **तीन डोकी** असणारे देव भारताच्या प्राचीन सर्वोच्च ईश्वरात आणि जपानच्या बुद्धामध्येहि आढळतात (पाने १७-१८). *''त्रैक्याची मान्यता ही जगाच्या सर्व प्राचीन देशात सार्वत्रिक (Universal) होती.''* (पान १८)

जुन्या करारात एक विषय पुनः पुन्हा आढळतो. तो म्हणजे मूर्तिपूजकांच्या देवांचा किंवा मूर्तीचा **देवाला** (याहोवाला) असणारा तिटकारा, वीट किंवा घृणा होय. इस्राएलाच्या देवाने स्वतःची समानता त्या घृणास्पद मूर्तिपूजक अशा कुठल्याच बाबीशी कधीच केली नव्हती!

*त्रैक्याची* शिकवण काय आहे याबद्दलची दोन प्रसिद्ध त्रैक्यवादी शिक्षकांची (प्रातिनिधीक) मते पुढे दिली आहेत :

*''दैवी त्रैक्य'' याबद्दल आम्हाला असे म्हणावयाचे आहे की देवत्वामध्ये तीन भिन्न व स्पष्ट दिसणाऱ्या व्यक्ति आहेत. त्यातील प्रत्येकाला आपले व्यक्तिगत आत्मिक शरीर, व्यक्तिगत जीव आणि व्यक्तिगत आत्मा ही आहेत. जसे प्रत्येक मानवप्राण्याला, देवदूताला किंवा इतर कुठल्याही विभूतीला स्वतःचे शरीर, जीव व आत्मा असतो अगदी तसेच. शरीर असा उल्लेख करतांना आम्ही ते आत्मिक शरीर*

*किंवा मांसमय शरीर समजतो. ते शरीर हे व्यक्तिगत जीवाचे व आत्म्याचे राहण्याचे घर असते. जीव म्हणजे ज्याला भावना आहेत असा आणि आत्मा म्हणजे जो जाणतो किंवा ओळखतो.''* (फिनीस जे. डेक-डेक्स ॲनॉटेटेड् रेफरन्स बायबल)

कीथ एल. ब्रुक्स म्हणतो, *''त्र्यैक्याचा सिद्धांत जर स्वीकारला नाही तर ख्रिस्त हा दैवी नाही. आणि त्याच्या उद्धारकार्याचे स्वरूप निष्फळ किंवा कुचकामी ठरते. जर त्र्यैक्य आहे तर... आणि येशूची व पवित्र आत्म्याची भक्ति केली जात नाही, तर दोन तृतीयांश देवत्व योग्य प्रकारच्या भक्तीला वंचित ठरते.''* (अवर डेली ब्रेड, जुलै ८, १९७१ मधून उध्दृत केले)

स्वतःच्याच दृष्टिकोनातून शहाणे असणाऱ्या मनुष्यांचे हे शब्द आहेत. आपले अज्ञान व मूर्खपणा प्रकट करून ते स्वतःचेच हसू करून घेत आहेत.

**येशू ख्रिस्त देवत्वाचा केवळ *एक-तृतियांश* भाग आहे का?** १ तिमथ्य ३:१६ आणि कलस्सै. २:९ ही शास्त्रवचने स्पष्टपणे नमूद करतात की **देव देहात प्रकट झाला**, आणि प्रभु येशू ख्रिस्त हा **देवत्वाचे देहात असलेले *पूर्णत्व* होता**. याचाच साधा अर्थ, ***एक देव एका व्यक्तीत.*** म्हणजेच **येशू ख्रिस्त** ह्या ***एकाच व्यक्तीत.***

सर्वसमर्थ एक देवाचे तीन समभाग तुकडे करून किंवा वाटे घालून त्याचे *तीन देव* बनवण्यासाठी त्र्यैक्यवादी खाटीक बनले आहेत. देव हा त्र्यैक्य आहे किंवा 'त्रैक *देव'* आहे अशा प्रकारचा उल्लेख किंवा निर्देश पवित्र शास्त्रात कोठेच नाही. तरीपण त्र्यैक्याचे अस्तित्व सूचित करण्याकरता त्र्यैक्यवादी जवळ जवळ ८० ''भक्कम शास्त्रवचने'' उध्दृत करू शकतात.

दुसऱ्या शतकात शेवटच्या प्रेषिताच्या मृत्यूनंतर कधीतरी ह्या *त्र्यैक्य* सिद्धांताचा प्रसार किंवा फैलाव करण्यात आला होता. देवत्व काय आहे याचा छडा लावण्याचा किंवा उलगडा करण्याचा प्रयत्न करणारे पुष्कळ ईश्वरविज्ञान पंडित होऊन गेले. त्यांच्यापैकीच इग्नेशस, पॉलिकार्प, जस्टिन मार्टर, आयरेनियस क्लेमेंत आणि इतर बरेच जण होते.

जस्टीनला हे प्रथम कसे काय नीट (व्यवस्थित) समजले आणि त्यानंतर तोच कसा चुकीच्या प्रवाहात किंवा गोंधळात सापडला हे आपण पाहू या.

*''हा दृष्टीकोन व्यक्त करण्यासाठी जस्टीनला महत्प्रयास पडले. त्याच्यासमोर फायलो, एवढेच काय, संत योहान यांचेहि मागील दाखले किंवा उदाहरणे होती, हे खरे आहे. कारण संत योहानामध्ये **लोगॉस** किंवा **बुद्धिचातुर्य (Reason)** किंवा शब्द हा सामर्थ्य आहे ज्याच्यायोगे देवाने जग केले, तसेच जगात येणाऱ्या प्रत्येकाला प्रकाशित करणारा प्रकाशहि बनवला. (हे जर तंतोतंत भाषांतर असेल तर) परंतु जस्टीनने ह्या बाबीची अगदी काटेकोर व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. दैवी बुद्धि हा दुसरा **देव** आहे. संख्येच्या किंवा क्रमाच्या दृष्टीने तो दुसरा देव आहे, पण मनाच्या दृष्टीकोनातून नव्हे; याचाच अर्थ 'तो दुसरा देव आहे आणि तो दुसरा देव नाही.''* (डिक्शनरी ऑफ ख्रिश्चन बायॉग्राफी)

आता, हे तुम्हाला समजते का पाहा :

*''काहीजण म्हणाले, देवामध्ये केवळ एकच तत्व होते तीन नव्हे. ह्या संज्ञांना कांहीनी परवानगी दिली तर कांहीनी त्या नाकारल्या... त्या काळात वर्चस्व असणाऱ्या पाखंडी मताद्वारे आणि त्यांच्या सारासार बुद्धिद्वारे त्याच्याशी मुकाबला करण्यांच्या पद्धतीबद्दल त्यांचे मार्गदर्शन झाले... देव हा संख्येने तीन आहे, असे कांहीजण जाहीर करतात; दुसरे म्हणतात*

*संख्येने तो एक आहे; तर त्याचवेळी त्या रहस्यमय स्वभावाबद्दलच्या चर्चेतून (वादातून) संख्येची कल्पनाच वगळून टाकणे हे अधिक तात्विक वाटण्यासारखे आहे. त्याच्याकडे एक काय अगर तीन काय अशा दृष्टीने पाहिले तरी ते तुलनेच्या पलिकडचे आहे. एकूण काय, तेणेकडून ते कोसळणार नाही किंवा त्याचे काल्पनिक वर्ग किंवा प्रकारहि बनणार नाहीत.'' (द एरियन ऑफ द फोर्थ सेंचरी)*

अनेक शतकांपासून *त्रैक्याचा* सिद्धांत हा बहुतेक प्रॉटेस्टंट, सुवार्तेवर विश्वास ठेवणाऱ्या आणि कॅथॉलिक मंडळ्यांचा केंद्रवर्ती सिद्धांत आहे. तरीपण तो सिद्धांत *''पवित्र जनांच्या एकदाच स्वाधीन केलेल्या विश्वासाचा''* भाग नाही. (यहुदाचे पत्र ३) द कॅथॉलिक एन्सायक्लोपिडियामध्ये असे नमूद केले आहे :

''मंडळी हे जे त्र्यैक्य शिकविते ते देवाच्या स्वभावाबद्दलचे असून देवाचा पुत्र येशू ख्रिस्त तें जगाला देण्यासाठी पृथ्वीवर आला. आणि तेच ती (कॅथॉलिक मंडळी) मनुष्याला त्या संपूर्ण तत्वप्रणालीचा पाया म्हणून सुचविते.

म्हणून आपण समजू शकतो की त्र्यैक्याचा सिद्धांत हा त्या संपूर्ण तत्वप्रणालीचा पायाभूत सिद्धांत आहे. हा प्रसार रोमन कॅथॉलिक मंडळीनेच केला. आणि ४ थ्या शतकाच्या शेवटच्या २५ वर्षात हा *''निश्चितप्रकारचा त्र्यैक्य सिद्धांत म्हणजेच तीन व्यक्तीत एक* ***देव*** *हा ख्रिस्ती जीवनाचा व विचाराचा पूर्णपणे अविभाज्य असा भाग बनला.''* (''होली ट्रिनिटी'' - न्यू कॅथॉलिक एन्सायक्लोपिडिया)

त्रैक्यावरील विश्वासाबद्दलच्या नोंदी हे प्रकट करतात :

''विविध मतांच्या सनातनी फादर लोकांमध्ये (धर्मगुरुमध्ये) ह्या रहस्यमय विषयांचे जे अस्तित्व आहे त्याबद्दल त्याची चर्चकडून अंतिम व्याख्या होत नाही तोपर्यंत आम्ही संशय घेऊ शकत नाही.''(डिक्शनरी ऑफ डॉक्टरिन्स अँड हिस्टरी थिऑलजी)

आणि खरोखरच देवत्वाच्या सिद्धांताची अंतिम व्याख्या बनली गेली-म्हणजेच 'एका देवात तीन' ही व्याख्या इ. सन ३२५ मध्ये ख्रिस्ताचा मृत्यू, पुनरूत्थान व स्वर्गारोहन यानंतर साधारण ३०० वर्षांनी जन्मली! ह्या सिद्धांताच्या प्रसाराचे नेतृत्व केले ते मूर्तिपूजक रोमने! तो एक मूर्तिपूजकांचा सिद्धांत होता आणि त्याची सुरवातही मूर्तिपूजक मंडळीने केली! हे त्र्यैक्य तुम्हाला 'नायसिन मतांगिकारात' आढळू शकते. तो मतांगिकार इ.सन ३२५ साली नायसियाच्या धर्मपरिषदेत प्रस्थापित झाला. तथाकथित *''प्रेषितांचा जो मतांगिकार''* (इ.सन. १०० ते १५०) तो कोणत्याही प्रेषिताने लिहिला नव्हता, त्रैक्य म्हणून तो देवत्वाची व्याख्या सुद्धा करीत नाही. *''अगोदरच पाहिल्याप्रमाणे तो प्रत्यक्षपणे आणि ताबडतोब किंवा लगेच असे देवाचे वचन नाही.''* (न्यू कॅथॉलिक एन्सायक्लोपिडिया) खरेच, तो देवाच्या वचनात कधीच आढळू शकत नाही!

तेव्हांपासून हे धर्ममत ख्रिस्ती जीवन व विचारामध्ये पूर्णपणे मिसळून गेले आहे. आणि देवत्वासंबंधीचा हा चुकीचा सिद्धांत टाकून द्यायला बहुतेक ख्रिस्ती लोक धजत नाहीत.

*''बाबांनो, तो सिद्धांत म्हणजे एक* ***न*** *उलगडणारे कोडे (रहस्य) आहे! त्याचा कीस न काढता त्याच्यावर विश्वास ठेवून तो फक्त स्वीकारायचा, एवढेच तुमचे काम!''* मंडळीच्या प्रणालीकडून अशा तऱ्हेचे बाळकडू त्यांना पाजण्यात आलेले असते.

होय, मंडळीच्या प्रणालीची ती निर्मिती असल्याकारणाने खरोखरच ते एक

रहस्य आहे!

*''ते प्राचीन आणि आधुनिक काळातील एक चुकीचे फलिदायी कारण आहे. स्पष्टीकरण किंवा विवरण करण्याच्या प्रयत्नातून तो सिद्धांत निष्पन्न झाला आहे. विश्वासाने स्वीकारायचे असे ते रहस्य आहे. ते स्वभावतःच मानवी बुद्धीला समजसाध्य होण्यासारखे नाही हे ते विसरतात.'' (''ट्रिनिटी'' डिक्शनरी ऑफ डॉक्टरिन अँड हिस्टरी थिऑलजी)*

जे मुळात अस्तित्वातच नाही त्यावर खरा ख्रिस्ती मनुष्य विश्वास व भरवसा ठेऊ शकतो का?

*त्रैक्य* हे नेहमीच रहस्य असत आले आहे. त्यांत भरपूर वादविवाद असून कोणालाहि समजण्यास ते क्लिष्ट आहे. ते समजून घेण्यासाठी झालेले सर्व पांडित्यपूर्ण प्रयत्न केवळ आधिकाधिक गैरसमजास कारणीभूत ठरले आहेत! त्याचा उलगडा करण्यासाठी केल्या गेलेल्या सर्व प्रयत्नांनी परिणामी अधिक गोंधळच माजवला आहे.


का बरे?

याचे साधे कारण हेच की ती एक मानवनिर्मित कल्पित कथा आहे! *''त्रैक्य''* ह्या शब्दाचा उल्लेख पवित्र शास्त्रात कोठेहि नाही हे सर्व शास्त्राभ्यासक मान्य करतात. ते **फक्त सूचित केले गेले आहे** *(Only implied)* एवढेच ते म्हणतात. सुस्पष्ट शास्त्रवचनांचा अर्थ सांगण्यासाठी अस्पष्ट किंवा दुर्बोध *(Obscure)* शास्त्रवचने वापरण्याचा प्रयत्न करणे ही सवय तशी जुनीपुराणीच आहे.

ही समस्या सोडवण्यासाठी ते अधिक पटण्याजोगी, सुबोध, समंजस किंवा अर्थवाही पद्धत का अवलंबित नाहीत? म्हणजेच दुर्बोध किंवा संदिग्ध शास्त्रवचनांचे पृथक्करण करण्यासाठी व समजून घेण्यासाठी सुस्पष्ट शास्त्रवचने वापरणे हा मार्ग ते का चोखाळीत नाहीत?

देवाचे गौरवी सत्य आणि मनुष्यांचे शाब्दिक व काल्पनिक असे दैहिक सिद्धांत यातील फरक समजून घेण्यासाठी साह्य म्हणून पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्यांना पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाची किती नितांत गरज आहे!

**त्रैक ईश्वर ...**



**... प्राचीन असिरियात अशा चिन्हांची भक्ती होत असे.**



**.... सैबरियातील मूर्तिपूजकांचे भक्तिचिन्ह**

## मंडळयांचे संप्रदाय म्हणतात :




**देवाचे वचन म्हणते :**

''तुम्हाला ठाऊक नाही अशांची उपसना तुम्ही करता... खरे उपासक पित्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने करतील: कारण आपली अशीच भक्ति करणाऱ्यांस बाप शोधित आहे. देव आत्मा आहे, आणि जे त्याची भक्ति करतात त्यांनी आत्म्यांत व खरेपणांत त्याची भक्ति केली पाहिजे. देव प्रकाश (*प्रकटीकरण, सत्य*) आहे. आणि त्याच्यामध्ये अंधःकार (*रुढीपरंपरा, खोटेपणा*) मुळीच नाही.''

**हे आहे त्रैक्य – आपण त्याचा उलगडा करू शकता का?**
**'त्रैक्यमतवाद' अशी आपली आग्रही भूमिका असेल तर आपणास कशाचे समर्थन करावे लागेल ते पहा!**

# अथनेसियन मतांगिकार

कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट आणि पेंटेकॉस्टल मंडळयांनी पसंती दर्शवून पाठपुरावा केलेला **त्रैक्याचा** मूलभूत सिद्धांत.

पुढील उतारा न्यू चाफ हरझॉग एन्सायक्लोपिडिया ऑफ रिलिजस नॉलेज, खंड ११, पान २०२ वर आढळतो. तो द गार्डियन, लंडन, ह्या वृत्तपत्रांत (१०/११/१९०९) मध्ये सुधारित भाषांतर स्वरूपात प्रसिद्ध झाला होता. कॅंटरबरीचे आर्चबिशपांच्या विनंतीनुसार तो तयार करण्यात आला असून १९०८ च्या लॅंबथ परिषदेतील ठरावानुसार आहे.

......

३. आता कॅथॉलिक विश्वास असा आहे : एक देव म्हणून आम्ही त्रैक्याची भक्ति करतो; आणि त्रैक्य हे ऐक्य आहे. अशी आमची धारणा आहे.

४. यात व्यक्तींचिहि गल्लत केली जात नाही व तत्वाचेहि विभाजन केले जात नाही.

५. कारण **पिता** ही व्यक्ति आहे, दुसरी व्यक्ति पुत्र आहे आणि पवित्र आत्मा ही सुद्धा निराळी व्यक्ति आहे.

६. परंतु पित्याचे, पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे देवत्व एक आहे, त्यांचे गौरव समान आणि त्यांची थोरवी (ऐश्वर्य) सहअनंतकालिक आहे.

७. जसा पिता आहे, त्यासारखाच पुत्र आहे, आणि त्यासारखाच पवित्र आत्मा आहे.

८. पिता उत्पन्न केलेला नाही, पुत्र उत्पन्न केलेला नाही, पवित्र आत्मा उत्पन्न केलेला नाही.

९. पिता अमर्याद, पुत्र अमर्याद, पवित्र आत्मा अमर्याद.

१०. पिता सनातन, पुत्र सनातन, पवित्र आत्मा सनातन

११. आणि तरीसुद्धा ते तीन सनातन नाहीत तर एकच सनातन.

१२. जसे ते तीन निर्माण केलेले नाहीत, तीन अमर्यादहि नाहीत परंतु एक अमर्याद आणि एक निर्माण न केलेला.

१३. म्हणून ज्याप्रमाणे पिता सर्वसमर्थ आहे, पुत्र सर्वसमर्थ आहे आणि पवित्र आत्मा सर्वसमर्थ आहे.

१४. आणि तरीहि ते तीन सर्वसमर्थ नसून केवळ एक सर्वसमर्थ आहे.
१५. म्हणून पिता देव आहे, पुत्र देव आहे, पवित्र आत्मा देव आहे.
१६. आणि तरीहि ते तीन देव नाहीत पण एक देव.
१७. म्हणून पिता प्रभु आहे, पुत्र प्रभु आहे, पवित्र आत्मा प्रभु आहे.
१८. आणि तरीहि ते तीन प्रभु नाहीत, परंतु एक प्रभु.
१९. कारण जसे आम्हाला ख्रिस्ती सत्याकडून प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे देव आणि प्रभु कबूल करण्यास भाग पाडले जाते.
२०. तसेच आम्हाला तीन देव किंवा तीन प्रभु असे बोलण्याची कॅथॉलिक धर्माकडून मनाई करण्यात येते.
२१. पिता कोणापासूनहि नाही, बनवला गेला नाही, उत्पन्नहि केला गेला नाही किंवा जन्मविलेलाहि नाही.
२२. पुत्र केवळ पित्यापासूनच आहे, बनवला गेला नाही, उत्पन्न केला गेला नाही, पण जन्मलेला आहे.
२३. पवित्र आत्मा हा पित्यापासून आणि पुत्रापासून आहे, बनवला गेला नाहि, उत्पन्नहि केला गेला नाही, जन्मविलेलाहि नाही, पण... पासून येतो.
२४. या कारणास्तव एक पिता आहे, तीन पिते नाहीत, एक पुत्र आहे, तीन पुत्र नाहीत, एक पवित्र आत्मा आहे, तीन पवित्र आत्मे नाहीत.
२५. आणि त्रैक्यामध्ये कोणीहि अगोदर किंवा नंतर नाही, कोणिहि मोठा नाही, किंवा लहान नाही.
२६. परंतु तिन्हीहि व्यक्ति सह-अनादि (एकदुसऱ्याशी) आणि सह-समान आहेत.
२७. म्हणून वर म्हटल्याप्रमाणे सर्व बाबतीत त्रैक्याची भक्ति ऐक्य म्हणून केली जावी, आणि ऐक्याची भक्ति त्रैक्य म्हणून केली जावी.
२८. म्हणून तारण साधु इच्छिणाऱ्याने त्रैक्याबद्दल असाच विचार करावा.

**आता—एवढे सर्व असले तरीहि तुमचा त्रैक्यावर विश्वास आहे?**

## याच लेखकाची इतर पुस्तके - साठा असेपर्यंत विनंतीवरुन विनामूल्य मिळतील

**लोगॉस : देवाच्या सृष्टीचे आदिकारण** - *देवत्वाचे प्रकटीकरण किंवा देवत्वाची शिकवण*

**तुम्ही देवाला मागे टाकू शकत नाही.** *दान देण्याच्याबाबतीत शिकवण.*

**कोकऱ्याचे लग्न** - *ख्रिस्ताचे त्याच्या मंडळीसाठी येणे.*

**गौरवापासून गौरवांत** - *आमचे रुपांतर (मेटॉमॉर्फोसिस)*

मित्र हो,

ह्या पुस्तकांतील संदेशाद्वारे आपणांस आशीर्वाद मिळाला असेल तर आपल्या विश्वासाबद्दल ऐकायला आम्हाला आवडेल. उपलब्ध संदेशांपैकी इतर संदेश आपणांस हवे असतील तर आपल्या देशांतर्गत नजिक असलेल्या खालीलपैकी एका पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

कृपया आपले नांव व पत्ता सुवाच्य अक्षरांत लिहा. खालील यादीतील विश्वासणारे/वचनाचे सेवक हे स्वतंत्र सेवा करणारे व स्वयंपोषित (Self-Supporting) आहेत. **सिंगापूरच्या 'प्रॉफेटिक रेव्हलेशन'** ह्या सेवेचे ते प्रतिनिधी किंवा शाखा (Branches) नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**ब्र. रिचर्ड डिसोझा :**
बी. आय. टी. ब्लॉक, १२/६३,७८, रेब्श स्ट्रीट, आग्रीपाडा, मुंबई-४०० ०११.

**ब्र. सोना डी. देठे :**
''सुवार्ता'' मु.पो. शेंडी/पोखर्डी, ता. नगर, जि. अहमदनगर. पिन-४१४ ००१.

**ब्र. पी. जी. भालेराव :**
''शालोम'' पो. बॉक्स नं. २५, श्रीगोंदा. पीन-४१३ ७०१. दूरध्वनी : २२३९०

**ब्र. फ्रॅन्क गमरे :**
हाऊस नं. ४७, तारकपूर, अहमदनगर, दूरध्वनी : ३२६३०८.

**ब्र. व्हि. एन. जाधव :**
ख्रिश्चन मिशन कम्पाऊंड, राम मंदिर समोर, सांगली-४१६ ४१६

**ब्र. जे. व्ही. लोंढे**
''सुवार्ता'' टाकली रोड, कोपरगांव, अहमदनगर - ४२३ ६०१.

# PROPHETIC*REVELATION

GHIM MOH EST., P. O. Box 333
Republic of Singapore - 912742

गरुड आरोळी ठोकतो

*The Eagle screams...*





*...the Dove leads.*

कबूतर मार्गदर्शन करते